


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

www.dainikmahasagar.in Epaper: www.epaper.dainikmahasagar.in

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | मंगळवार, २१ ऑक्टोबर २०२५ | वर्षः १ | अंक:१३८ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


अग्राग्रलेख

खरीखरी

## दीपा, दीपा दीपत्कार !

आपल्या देशात सर्वाधिक श्रद्धेचा, सर्वाधिक चर्चेचा, सर्वाधिक खाऊ गिरीचा, सर्वाधिक पर्यटनाचा, सर्वाधिक प्रेम-संदेशांचा तसेच सर्वाधिक शुभ संदेशांचा वगैरे वगैरे सर्वाधिक लोकप्रिय असलेला दीपावलीचा दिवस आज उगवला आहे. ज्या लोकांचे वय पन्नाशीच्या पुढे आहे. त्यांच्या मनात तेव्हाची दिवाळी आणि आत्ताची दिवाळी या मधला फरक पटकन लक्षात येतो कारण पूर्वी पोस्टाच्या माध्यमातून आपल्या जवळच्या नातलगांना, मित्र-मैत्रिणींना आणि आप्तेष्टांना नवसंदेश जात असत. त्यामध्ये प्रेमाचा ओलावा आणि नात्याची जवळीक दिसून येत असे. आता मोबाईल नावाचा हा प्राणी आपल्याकडे आला आणि आपसातील प्रेमाचा ओलावा गलितगात्र झाला. आपल्या मोबाईल मध्ये जेवढे काही क्रमांक सेव्ह असतील त्या सर्वांना एका झटक्यात कचकन दिवाळीच्या शुभेच्छा पोहोचतात. अनेक प्रियजन हे संदेश वाचण्याचे कष्टही घेत नाहीत, हा बहुधा सर्वांचाच अनुभव असावा. पूर्वी दुकानात जाऊन शुभेच्छा संदेशाची पत्रे घेणे किंवा प्रेमपत्र घेणे, लिफाफ्यावर पत्ता लिहिणे त्यावर तिकीट लावणे आणि पोस्टाच्या पेटीत टाकणे एवढी गोष्ट आता कोण करणार आहे. पूर्वीच्या काळी घरात दिवाळी करता जे पदार्थ बनायचे त्यामुळे दिवाळीच्या आधीच चार-आठ दिवस तेला, तुपाचा घमघमाट आणि त्याच्या स्वादाचा सुगंध आपल्या नाकाला प्रसन्न करून जात होता. आता सुगंध उडून गेला आणि अचानक हल्दीराम आणि जल्दीराम यांच्याकडे त्यांचे डबे विकत घेण्यासाठी रांगा लागू लागलेल्या आहेत. दिवाळी साजरी करण्याची जुनी कल्पना आणि आताची कल्पना यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. पूर्वी दिवाळी म्हटली की प्रत्येक मराठी माणसाच्या घरात किमान दोन ते चार वाचनासाठी दिवाळी अंक दिसायचेच. आताही दिवाळी अंक प्रकाशित होतात, अगदी शेकड्यांनी प्रकाशित होतात. पण त्या दिवाळी अंकांमध्ये पूर्वीच्या दिवाळी अंकांचा तो दरारा आणि तसे लेखक का दिसत नाहीत, हा प्रश्न खरं तर कोणीच विचारू नये. खरे म्हणजे दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे कारण अमावस्येच्या रात्री दिव्यांची रोषणाई करून आपण लक्ष्मीला आमंत्रित करतो. ते पूर्वीचे स्वरूप आता विजेच्या दिव्यांच्या झगमगटामध्ये लोप पावत चाललेले आहे. बिचारा एकुलता एक दिवा विजेच्या त्या अनेक दिव्यांच्या लखलखाटामध्ये ओशाळल्यासारखा जळत असतो. त्याच्या आजूबाजूला विजेचा जो काही प्रकाश आणि इतका झगझगाट असतो की त्याला पाहून, मंद तेलगंध प्रसवणारा दिवा ओशाळला नाही तरच नवल! मग आता हे दिवे भविष्यात किती काळ जिवंत राहतील, हाही अभ्यासाचा विषय आहे. दिवाळीच्या सुट्टीमध्ये मामाच्या गावात जाऊन मस्त मजा करण्याचे दिवस बालकांच्या दहा ते पंधरा किलो दप्तराच्या नको असणाऱ्या ओझ्याच्या वजनात विरून गेलेले आहेत. काही वर्ष मामा, काका, भाऊ व बहीण तरी आहेत. पुढच्या पिढीला ही नाती होती असे सांगावे लागेल. जाऊ द्या, दिवाळीच्या दिवशी मस्त मज्जा करा, विकत आणलेला फराळ आणि मिठाई खा आणि दिवाळी साजरी करा. असे सर्व काही असले तरी दिव्याचा दीपत्कार यापुढेही भावनाशील माणसाला निश्चितच दिव्यत्वाची जाणीव देऊन जाईल, यात शंका नाही त्यासाठीच सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा...!!!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# आयएनएस विक्रांतने पाकिस्तानची झोप उडवली

## दिवाळीनिमित्त पंतप्रधान मोदींनी नौदलाचे केले कौतुक

**गोवा , दि. २० वृत्तसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाची दिवाळी स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत वरील नौदल कर्मचाऱ्यांसोबत साजरी केली. यावेळी त्यांनी नौदलाच्या पराक्रमाचे कौतुक केले. या युद्धनौकेमुळे 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानची झोप उडाली होती, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गोवा आणि कारवारच्या किनाऱ्यावरील आयएनएस विक्रांतला भेट देऊन भारतीय सशस्त्र दलांसोबत दिवाळी साजरी करण्याची परंपरा कायम ठेवली. आयएनएस विक्रांतवर बसून, पंतप्रधान मोदी मिग-२९के लढाऊ विमानांच्या बाजूने असलेल्या फ्लाईटडेकवर गेले आणि दिवसा आणि रात्री दोन्ही वेळी मिग २९ लढाऊ विमानांच्या लहान धावपट्टीवर उड्डाण आणि उतरण्याच्या हवाई शक्तीचे प्रात्यक्षिक पाहिले. भेटीदरम्यान, त्यांनी विमानवाहू जहाजावरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या समर्पणाचे कौतुक केले. त्यांनी जहाजावरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांना मिठाई वाटली आणि संबोधित केले.

ही केवळ एक युद्धनौका नसून, २१ व्या शतकातील भारताची मेहनत, प्रतिभा, प्रभाव आणि वचनबद्धता यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. "आयएनएस विक्रांत हे असे नाव आहे, जे लढाई सुरू होण्यापूर्वीच शत्रूचे धैर्य खचवते," असे ते म्हणाले.

२२ एप्रिलच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर नौदलाला अरबी समुद्रात 'हाय अलर्ट'वर ठेवण्यात आले होते. यावेळी आयएनएस विक्रांत आपल्या सोबत ८ ते १० युद्धनौका घेऊन मध्यभागी तैनात होती. भारतीय नौदलाच्या शांतताकाळातील नेहमीच्या सरावांव्यतिरिक्त, ही एक अत्यंत मोठी आणि वास्तविक वेळेतील निर्णायक हालचाल होती. या तैनातीमुळे पाकिस्तानला संभाव्य नौदल हल्ल्याच्या भीतीने धोक्याचे इशारे जारी करावे लागले होते. युद्धनौकेवर घालवलेल्या रात्रीचा अनुभव सांगताना पंतप्रधान मोदी भावूक झाले. ते म्हणाले, "मी 'वर्तमान क्षणात जगणे' किती महत्त्वाचे आहे, हे तुमच्याकडून शिकलो. तुमचे समर्पण इतके मोठे आहे की मी ते पूर्णपणे जगू शकलो नाही, पण अनुभवले नक्कीच आहे. रोजच्या जीवनातील तुमचे हे आव्हान किती मोठे आहे, याची मला कल्पना आहे." रात्रीचा महासागर आणि पहाटेचा सूर्योदय पाहून त्यांची दिवाळी अधिक खास झाल्याचेही नरेंद्र मोदी यांनी सांगितले.



**छत्रपती शिवाजी महाराजांकडून प्रेरणा..**

मोदींनी सांगितले की, गेल्या ११ वर्षांत संरक्षण क्षेत्रातील उत्पादन तीन पटीने वाढले आहे. तसेच, साधारणपणे दर ४० दिवसांनी एक नवीन युद्धनौका किंवा पाणबुडी नौदलात सामील होत आहे. त्यांनी ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या वाढत्या जागतिक मागणीचा उल्लेख करत, भारत लवकरच जगातील शीर्ष संरक्षण निर्यातदार देशांमध्ये सामील होईल, असा विश्वास व्यक्त केला.

त्यांनी आठवण करून दिली की, जेव्हा ही युद्धनौका देशाला सुपूर्द केली जात होती, तेव्हा नौदलाने वसाहतवादी वारशाचे एक मोठे प्रतीक बाजूला सारून छत्रपती शिवाजी महाराजांकडून प्रेरणा घेतलेला नवीन ध्वज स्वीकारला.

# नरकासूर कोण ते सगळ्यांनाच माहीत आहे – उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

भाजपाच्या माजी नगरसेविका संगीता गायकवाड यांनी उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. इतर काही नेतेही शिवसेनेत आले. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी छोटेखानी भाषण केलं. नरकासूर कोण आणि त्याचा वध कसा करायचा हे तुम्हाला माहीत आहे असं सूचक विधान ठाकरेंनी केलं. तसंच नाशिकमध्ये मी पुन्हा येईन असंही उद्धव ठाकरे म्हणाले. ज्यानंतर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. महापालिकेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत.

सगळ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देतो आहे. आज नरक चतुर्दशी आहे, कृष्णाने नरकासूराचा वध केला. नरकासूर कोण वेगळं सांगायची गरज नाही. त्याचा वध करण्यासाठी संगीता गायकवाड आणि इतर मंडळी शिवसेनेत आली आहेत. आता हा प्रवाह सुरु झाला आहे. जे मतचोरी करुन



तिकडे बसले आहेत त्यांची चोरी आपण चोरांसकट पकडली आहे. या चोरांना हद्दपार करण्यासाठी सर्व मराठी माणसं, अमराठीही एकत्र आले आहेत. कारण कुणालाच हे आवडलेलं नाही.

महाराष्ट्र हा लढणारा आहे. संगीता गायकवाड आणि इतर सगळे शिवसेनेत आले मी सगळ्यांच्या देखत तुम्हाला विचारतो तुम्हाला काही खोके वगैरे मिळाले आहेत का? काही धाक दाखवला गेला का? कारण शेवटी लालूच दाखवून घेतलेली माणसं नेभळट असतात. यापेक्षा निष्ठावान सैनिक मला प्रिय आहेत. मी भाजपाच्या सगळ्याच नेत्यांना विनंती करतो आहे आपण कसं विष पोसत आहात याकडे डोळे उघडून बघा. इतिहासात पापाचे धनी म्हणून स्वतःची नोंद होऊ देऊ नका. मी नाशिकमध्ये तसा आधीही येऊन गेलो आहे. पण नाशिकमध्ये मी पुन्हा येईन. त्यावेळी भगवा फडकलेला असला पाहिजे असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.


# शेतकऱ्यांनो, आत्महत्या करण्यापेक्षा आमदाराला कापा - बच्चू कडूंचे वादग्रस्त वक्तव्य

**बुलढाणा, दि. २० प्रतिनिधी**

प्रहार संघटनेचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून संताप व्यक्त करताना एक अत्यंत वादग्रस्त आणि भडकाऊ आवाहन केले आहे. आत्महत्या करण्याऐवजी थेट एखाद्या आमदाराला कापून टाकण्याचा किंवा सार्वजनिक ठिकाणी विवस्त्र होऊन आंदोलन करण्याचा सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे. त्यांच्या या विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे.

शेतकरी हक्क परिषदेमध्ये बोलताना बच्चू कडू यांनी कापूस आणि इतर शेतमालाला मिळत असलेल्या कवडीमोल भावावरून (उदा. ३,००० रुपये) तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी शेतकऱ्यांना टोचून विचारले, "आपला कापूस ३,००० ला विकावा लागला तर काय कराल तुम्ही? सगळी शांत, आत्महत्या! अरे, तू मरण्यापेक्षा एखाद्याला मारून टाक ना! एखादा आमदार तरी कापला का?"

यावेळी त्यांनी आंदोलनाची आणखी एक सीमा ओलांडणारी पद्धत सांगितली. ते म्हणाले, "आत्महत्या केल्यापेक्षा त्या आमदाराच्या घरासमोर पूर्ण कपडे काढून बसायचं. कपडे ठेवायचे नाही आणि घराच्या समोर जाऊन बस आणि उठ. काय पीक मेल्याशिवाय परवडत नाही का? हा धिंगाना जर सुरू केला ना, तर सांगतोय.." आपल्या वक्तव्यावर होणाऱ्या संभाव्य टीकेची पर्वा न करता, बच्चू कडू यांनी स्वतःवरील गुन्ह्यांचा उल्लेख केला. "माझ्यावर साडेतीनशे गुन्हे दाखल आहेत. आतापर्यंत चार कलेक्टर आडवे केले, तीन सचिव मंत्रालयात ठोकले, काय फरक पडला? करून काय करणार आहेत?" असा संताप त्यांनी व्यक्त केला.



# विरोधकांच्या फुसक्या लवंग्यांचा आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही- शिंदे

**ठाणे, दि. २० प्रतिनिधी**

विरोधकांनी आता कितीही लवंग्या-सुरसुरी फोडल्या, तरी आम्ही त्याकडे पाहतही नाही. कारण महायुतीकडे ॲटम बॉम्ब आहे आणि तो फुटला की विरोधकांचे राजकीय अस्तित्व उडून जाईल" असा स्फोटक इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात दिला. महायुतीसोबत महाराष्ट्राची जनता ठामपणे उभी आहे, म्हणूनच आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पूर्ण बहुमताने आमचीच सत्ता येणार असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ठाण्यातील रहेजा गार्डन येथे पार पडलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमानंतर शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधक दररोज आरोपांचे फटाके फोडतात, पण त्यांच्या त्या फुसक्या लवंग्यांचा आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही. आम्ही कामगिरीच्या ॲटम बॉम्बने महाराष्ट्र उजळवणार



आणि विरोधकांचा धुरळा उडवणार आहोत. आमचे लक्ष विकासावर आहे आणि विरोधकांचे काम फक्त आरोप, टीका करणे आहे असा टोला शिंदेंनी लगावला.

तसेच ठाण्यातील तरुणाईत आज जेवढा उत्साह आणि जल्लोष दिसतोय, ते महाराष्ट्राचं भविष्य आहे. ही परंपरा स्व. आनंद दिघे यांनी रुजवली, आणि आम्ही ती पुढे नेत आहोत. गोपाळकाला, गणेशोत्सव, नवरात्र, दसरा, दिवाळी ठाण्याचा प्रत्येक सण शक्तीचे प्रदर्शन असते. ठाणेकर हे माझे कुटुंब आहे. त्यांच्याच आशीर्वादाने मी मुख्यमंत्री झालो. आज मला आनंद दिघे आणि बाळासाहेब ठाकरे यांची आठवण झाली. बाळासाहेबांनी ठाण्यावर प्रेम केलं, दिघे साहेबांनी विकास केलाय. म्हणूनच ठाण्याला सणांची पंढरी म्हणतात असे एकनाथ शिंदेंनी म्हणाले. दरम्यान, शेतकरी संकटात असताना शिवसेना आणि महायुती सरकार त्यांच्यासोबत उभं आहे. आम्ही दिलेलें वचन पाळले. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीचा पैसा पोहोचतोय. या पुरात धाराशिव जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांच्या गायी वाहून गेल्या, त्या शेतकऱ्यांना १०१ दुभत्या गायी देण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. कारण शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेणं ही आमची संस्कृती आहे. संकटात धावून जाणं आम्हाला बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांनी शिकवलं आहे. त्यामुळे आम्ही केवळ बोलत नाही, कृती करून दाखवतो असंही एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# शनिवार वाड्यातील नमाज पठणावरून महायुतीत जुंपली

## राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून मेधा कुलकर्णींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पुणे, दि. २० प्रतिनिधी**

पुणे शहरातील शनिवारवाड्यात दोन दिवसापूर्वी काही मुस्लीम महिलांनी नमाज पठण केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर भाजपा नेत्या आणि राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी रविवारी दुपारी काही हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन शनिवारवाड्यात प्रवेश केला. तथाकथित मुस्लिम महिलांनी ज्या ठिकाणी नमज पठण केले होते त्या जागेवर गोमूत्र शिंपडलं आणि ती जागा शेणाने सारवली. तसेच सर्व कार्यकर्त्यांबरोबर त्या ठिकाणी शिववंदना केली. यासह मेधा कुलकर्णी व त्यांच्याबरोबर आलेल्या कार्यकर्त्यांनी शनिवारवाडा परिसरातील मजार काढून टाकण्याची मागणी केली.

यावरून मेधा कुलकर्णी यांच्यावर काँग्रेससह विरोधी पक्षांनी टीका केली आहे.



त्यापाठोपाठ त्यांच्याच मित्रपक्षांनी देखील त्यांच्यावर नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) नेत्या रूपाली ठोंबरे-पाटील यांनी खासदार मेधा कुलकर्णी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. यासह त्यांनी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने मेधा कुलकर्णी यांना समज द्यावी असंही सुचवले आहे.

रूपाली ठोंबरे म्हणाल्या, “मेधा कुलकर्णी यांच्यासारख्या अशिक्षित बाईने आम्हाला हिंदुत्व शिकवू नये. त्यांच्या या नौटंकीमुळे पुण्यात हिंदू मुस्लिमांमध्ये तेढ निर्माण होत आहे. समाजातील सामाजिक सलोखा बिघडतोय. त्यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल झाला पाहिजे आणि कारवाई केली पाहिजे.

राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे म्हणाल्या, “आपल्या धर्माचा स्वाभिमान असणं ही वेगळी गोष्ट आणि दुसऱ्या धर्माच्या भावना दुखावणं वेगळं. आपल्या धर्माचा प्रत्येकाला स्वाभिमान असायला पाहिजे. परंतु, ते करत असताना दुसऱ्या धर्माच्या भावना दुखावत असतील तर तो कायद्याने गुन्हा आहे. मेधा कुलकर्णी यांचं कृत्य बेकायदेशीर आहे. मेधा कुलकर्णी शिक्षिका असल्या तरी त्यांना ही गोष्ट माहीत नसेल की शनिवार वाडा हे मराठ्यांच्या विजयाचं प्रतीक आहे. शनिवारवाडा मेधा कुलकर्णी यांच्यासारख्या बुरसटलेल्या बुद्धीचं प्रतीक नाही. ते पेशवे सुद्धा आज वरून मेधा कुलकर्णी यांना शिव्या शाप देत असतील.”

## महत्त्वाचे

### बॅचलर ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांचा पदवी दिन समारंभ

**नाशिक ।** गोखले एज्युकेशन सोसायटी संचालित महर्षी सर डॉ. मो. स. गोसावी कॉलेज ऑफ फिजिओथेरपी अँड हेल्थ केअर मॅनेजमेंट यांच्या विद्यमाने बॅचलर ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांचा पदवी दिन समारंभ संस्थेच्या



गुरुदक्षिणा कॉम्प्लेक्स मधील "शर्मन हॉल" येथे उत्साहात पार पडला. या प्रसंगी गोखले एज्युकेशन सोसायटी संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे, संस्थेचे नाशिक विभागाचे विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी, महाविद्यालयाचे सहायक शाखा सचीव डॉ. एस. व्ही. अमृतकर, महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. एल. पी. शर्मा, "कस्तुरी इंटीग्रेटेड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल" चे समन्वयक डॉ. शरद खंडेलवाल, ह्यांच्या उपस्थितीत पार पडला. सदर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक विकास अकादमी चक्र महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. गौरांग बक्षी हे होते. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. सूत्रसंचालन लिना पिंजानी व दिशा मेवानी ह्या विद्यार्थ्यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. नुपूर अदमने यांनी केले.

### गवई यांच्यावर झालेला हल्ल्याचा रावळगावला निषेध

**मालेगाव ।** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर ६ ऑक्टोबर रोजी सुप्रीम कोर्टात झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर रावळगाव येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) आणि ईगल सोशल ग्रुपच्या वतीने निदर्शने करत तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू झालेल्या या निदर्शनामध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा व भारतीय राज्यघटनेच्या पूजनाने झाली. पूजनप्रसंगी आरपीआयचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गरुड यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाला प्रारंभ झाला. तिवारीवर अॅट्रॉसिटी कायद्यान्वये तसेच देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. निदर्शनावेळी जिभाऊ उशिरे, निलेश केदारे, अमोल अहिरे, प्रा. डॉ. स्वप्निल गरुड यांनी तीव्र शब्दांत भूमिका मांडली. सूत्रसंचालन महेंद्र अहिरे यांनी केले.

### टाकेद परिसरात बिबट्यांचा वावर

**सर्वतिर्थ टाकेद ।** टाकेद सह परिसरात बिबट्यांच्या हल्ल्याचे प्रमाण वाढले असून, लहान मुलांना लक्ष्य करणारे हे हल्ले चिंताजनक ठरत आहेत. नरभक्षी बिबटे बंदिस्त करण्यासाठी वनविभागाने विशेष मोहीम हाती घेतली असून ठिकठिकाणी पिंजरे लावण्यात आले आहेत. इगतपुरी वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या आदेशान्वये टाकेद व परिसरातील वाडी-वस्त्यांमध्ये वनपाल व वनरक्षक नागरिकांमध्ये जनजागृती करत आहेत. बिबट्यांविषयी गैरसमज दूर करून सुरक्षिततेच्या सूचना देण्यात येत असून, रोज रात्री गस्त सुरू आहे. नागरिकांना रात्रीच्या वेळी एकटे बाहेर न पडण्याचे, पाळीव प्राणी बंदिस्त ठेवण्याचे, घराजवळ उजेड ठेवण्याचे, झुडपे स्वच्छ करण्याचे तसेच बिबट्या दिसल्यास घाबरून न जाता वनविभागाला कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या मोहिमेत वनरक्षक गोरख बागुल, सुनील पवार, स्वाती लोखंडे, अश्विनी पाटील, बोरसे व चालक आंबेडकर आदींचा सहभाग आहे. टाकेद परिसरात दवंडी देऊन आणि सूचना फलक लावून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

### टी. झेड. विद्यामंदिरच्या माजी विद्यार्थी 59 वर्षांनंतर एकत्र

**भगूर ।** टी. झेड. विद्यामंदिरमधील अकरावी (एस.एस.सी.) 1966-67 च्या बॅचचे माजी विद्यार्थी तब्बल 59 वर्षांनंतर स्नेहसंमेलनासाठी



एकत्र आले. हा ऐतिहासिक सोहळा मुक्तिधाम येथील शाही परिवार हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात 75 वर्षांहून अधिक वयाचे जेष्ठ माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. भगूर पंचक्रोशीसह ग्रामीण, शहरी तसेच परगावातून आलेल्या विद्यार्थ्यांनी कुमारवयातील शालेय आठवणींना उजाळा देत पुन्हा एकदा शाळेचा सुवर्णकाळ अनुभवला. मेळाव्याचे प्रास्ताविक गणपत मुठाळ यांनी केले. दिवंगत सहकाऱ्यांना श्रद्धांजली अशोक लोया यांनी अर्पण केली. माजी विद्यार्थ्यांचा परिचय लक्ष्मण जारस यांनी करून दिला. जे. पी. गुंजाळ यांनी सूत्रसंचालन करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाला नारायण कांकरिया, अशोक कापसे, भास्कर बोडके, चंद्रकांत भालेराव, शशिकांत लोया, यमुना शिंदे, विजया काळे, तारा बलकवडे, जगन्नाथ झंवर आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते. या स्नेहसंमेलनाचे आयोजन जे. पी. गुंजाळ व गणपत मुठाळ यांनी केले होते.

# 'ती' दिवाळी अन् 'ही' दिवाळी!

दिन दिन दिवाळी गाई म्हशी ओवाळी असं काही राहिले नाही. गाई म्हशी पूर्वीसारखा राहिल्या नाहीत. दिवाळी ही 'दीन' झालीय.... तीन-चार दिवसांपूर्वी एक जवळची मैत्रीण घरी आली आणि मला म्हटली की चल आपण जरा फिरायला जाऊ. तिला म्हटलं नाही गं, मला जरा दिवाळीची कामं आहेत. तिने प्रश्न विचारला काय काम आहे ? तिला मी सांगितलं की, मला दिवाळीचे फराळ बनवायच आहे आणि मुलं आता सुट्टीमध्ये येणार व त्यांच्याकरता फराळ बनवणे गरजेचे आहे. तिने लागलीच मला उत्तर दिले, 'अरे, विजया...जमाना बदल गया है सब कुछ रेडीमेड मिलता है', काय घरी फराळ बनवते ? त्या एकाच प्रश्नाने माझ्या मनामध्ये दिवाळी का साजरी करायची आणि कशा करता याचे विचार मंथन सुरू झालं......

सुख वस्तीत असलेल्या नाशिक मधील या अनेक कुटुंबियांमध्ये अशा प्रकारे फराळ विकत घेण्याचा प्रघात सुरू झालेला आहे आणि मग मला सहज जाणवलं की शहरांमध्ये राहणारी दिवाळी आणि ग्रामीण भागामध्ये असणारी दिवाळी या मध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. त्यामध्ये जाणवते तो श्रीमंती आणि गरिबी मधला भेदभाव व वाढत चाललेली दरी....

दीपावली हा भारतीय संस्कृतीमध्ये अतिशय महत्त्वाचा असणारा एक सण आहे. अनेक वर्षापासून दिवाळी म्हणजे आनंद, मजा, मस्ती हे समीकरण कायम राहिले. दिव्यांची आरास, फराळांची मजा, फटाक्यांची आतिशबाजी हे सर्व पूर्वपार चालत आलेले आहेत. यात काळानुसार बदल जरूर झाला. परंतु मूळ उद्देश हा आजही कायम आहे. परंतु 'शहराकडे चला रोजगार मिळेल' या उद्देशाने शहरांमध्ये स्थायिक झालेले अनेक सुखवस्तू कुटुंबीयांमध्ये दररोजच दिवाळी साजरी केले जाते. अनेक ठिकाणी बायका वर्षभर दिवाळी साजरी करतात चितळे, मधुर, सागर, महाराष्ट्र भांडार यासारख्या दुकानांमधून पाहिजे ते पदार्थ म्हणजेच चकली, लाडू, अनारसे, शेव हे विकत घेऊन खात असतात. ऑनलाईन शॉपिंग ट्रेंडिंगमुळे तर वर्षभर वेगवेगळ्या प्रकारच्या मान्सून, दिवाळी, नाताळ सेल असेल तसेच ऑनलाइन शॉपिंग मधून कपड्याची खरेदी केली जाते.

दिवाळीमध्ये खरेदी केले जाणारे हे पदार्थ पचवण्याची शारीरिक क्षमता शहरांमधील सकाळी नऊला उठून रात्री बाराला झोपणाऱ्या महिलांमध्ये किंवा पुरुषवर्गामध्ये राहिलेली नाही. त्यामुळे जरी या दिवाळीच्या पदार्थांचा आस्वाद घेतला तरी ते पचवण्यासाठी अँटॅसिड सारखी विविध प्रकारची औषधे घ्यावी लागतात. शहरातील महिलांच्या बाबतीत माहेर सासर हा भेदभाव फारसा नसतोच. जेव्हा पाहिजे तेव्हा माहेरला जाणं येणं असल्यामुळे, दिवसभर माहेर मोबाइलद्वारे कनेक्टेड असते. भाऊबीजेला मुक्कामी न राहण्यापेक्षा एक फार्मलिटी म्हणून भाऊबीजेचे सोपस्कार पार पाडण्याकरता येत असतात व त्यातच धन्यता



मानतात. शहरांमध्ये भाऊबीजेच्या दिवशी हॉटेलमध्ये बसायला सुद्धा जागा नसते. याउलट ग्रामीण भागातील दिवाळी पूर्वीही 'दीन' होती आणि आजही 'दीन' आहे. कारण त्याचा संबंध हा आर्थिक सुबत्तेशी येतो. ग्रामीण भागामध्ये आजही जुन्या पद्धतीने दिवाळी साजरी केली जाते. ही दिवाळी खरी तर सुखाची आणि आनंदाची. दीपावली हे उत्सवाचे मूळ संस्कृत (दिपावली = दिप + अवली) दिप~प्रकाश +अवली~मालिका यांच्या पंक्तीचा संदर्भ देत जे सणा दरम्यान प्रकाशात अंधारावर मात करतात. प्रकाशाच्या विजयाचे आणि अंधारातल्या वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे आणि त्या दृष्टीने ग्रामीण भागामध्ये दिवे लावण्याची जी प्रथा आहे ती आजही आबाधित आहे. मोलकरणीची मदत न घेता घराची स्वच्छता असो, नवीन कपडे खरेदी करणे, त्याचप्रमाणे उटण्याचं स्नान हे सर्व काही वेगळे अनुभवायला आजकाल मिळत नाही. एकत्र कुटुंबामध्ये सर्व दिवाळीचे पदार्थ हे घरी बनवले जायचे आणि त्या मुळे एकमेकांच्या घरी फराळाला बोलवण्याची सुद्धा एक प्रचलित पद्धत पूर्वी असायची. एकमेकांच्या घरचे फराळाचे पदार्थ खाताना सोबत शेजार धर्म जपला जायचा. त्यामुळे शेजार धर्म घट्ट होण्यामध्ये एक आनंद मिळत असे. ग्रामीण भागातील ग्रामीण शैलीच्या घरासमोर शेणाने सारवलेल्या घरांसमोर रांगोळी काढण्याची जी मजा ती काही औरच होती आणि त्यामध्ये माहेरी आलेल्या मैत्रिणीची खूप दिवसानंतरची भेट, त्यांच्या त्या सुख दुःखाच्या गप्पा, त्यांचा तो मनमुरादपणे आनंद लुटणे हे सर्व काही चित्र आता हरवले आहे. त्यामुळे शहरातली असो किंवा ग्रामीण भागातील असो दिवाळी ही 'दीन' झालेली आहे. त्यामुळे या प्रचलित प्रथेमध्ये काही बदल करता जर आला तर तो काळानुसार केला पाहिजे असं मला वाटतं. वेगळ्या पद्धतीने दिवाळी साजरी करणे गरजेचे आहे. शहरांमध्ये आर्थिक सुबत्ता असल्यामुळे फटाक्यांची जी आतिशबाजी होऊन शहरातील हवेचे प्रदूषण होऊन अनेकांना विविध आजाराचे आयतचं निमंत्रण मिळतं. खरोखर दिवाळी ही 'दीन' झाली, याचा विचार हा सामान्यजणांनी केला पाहिजे. खरं तर या दिवाळीच्या जे काही वसुबारस धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मी पूजन, पाडवा आणि भाऊबीज दिवस साजरे केले जातात, त्या प्रत्येक दिवसाला शास्त्रीय कारणाबरोबरच पंचमहाभूतांशी संबंधित एक प्रतीक म्हणून त्या दिवसांकडे बघितलं पाहिजे. आज शहरांमध्ये अनेक घरांमध्ये कामाला असलेल्या मोलकरीण किंवा तुमच्याकडे असलेले मोलकरीण किंवा त्यांची मुलं यांच्या दिवाळीच्या आनंदात त्यांना विविध प्रकारचे मिष्टाने किंवा कपडे देऊन ते साजरी केली तर एक वेगळा आनंद मिळू शकतो आणि हा प्रयत्न प्रत्येकानं करायला हवा. स्वकेंद्रीत कुटुंब व्यवस्थेमुळे दिवाळीतील आनंद एकमेकांप्रति असणारी जिव्हाळ्याची भावना ही आता कमी होत चालली आहे आणि एक दिवस सण यांत्रिक पध्दतीने साजरा करायचा म्हणून तो साजरा केला जातो. तरीपण प्रथा व रुढी परंपरांमुळे 'दिन दिन दिवाळी, गाई-म्हशी ओवाळी' दीपोत्सवाचा हा पहिला दिवस म्हणजे कृतज्ञता आणि वात्सल्य यांच्या सुंदर संगमातून दिवाळीची शुभ सुरूवात उद्धृत करणारा दिवस म्हणजे वसुबारस..! बळीराजाच्या म्हणजे पर्यायाने सर्वांच्या घरात कायम दूध दुभतं आणि शेतात चांगलं पीक बहरू दे, हीच ईश्वरचरणी मनोभावे प्रार्थना करू या! सर्वांना मंगलमय दीपावलीच्या भरभरून शुभेच्छा!



**- डॉ. विजया मोगल (गायकवाड)**
**एमडी (आयुर्वेद) एम.ए.(सायकॉलॉजी)**

# नाशिकला 'हार्ट-सेफ' बनविण्याचा ध्यास

## विजन्स फाउंडेशनतर्फे जीवनदायी सीपीआर प्रशिक्षणाचा उपक्रम

**नाशिक ।** कोरोना महामारीत ज्यांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले आहे, त्या कुटुंबांना भावनिक आधारासोबत व्यावहारिक ज्ञान देऊन सक्षम करण्यासाठी हृदयस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये विजन्स युनिक हेल्थकेअर फाउंडेशनच्या वतीने सुमारे २०० नागरिकांसाठी सीपीआर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. रुंगटा विद्यालयात झालेल्या या कार्यशाळेत कोविड-१९ बाधितांच्या पत्नी आणि मुलांनी सहभाग घेतला.

फाउंडेशनच्या वतीने विजन हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सृष्टी विजन यांनी प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी दिव्यचेतना फाउंडेशनचे सहकार्य लाभले. ही संस्था महामारीत पालक गमावलेल्या मुलांच्या शिक्षण आणि कल्याणासाठी कार्यरत आहे. हे प्रशिक्षण



अत्यंत सोप्या आणि सहज समजेल अशा पद्धतीने देण्यात आले. यात 'हँड्स-ओन्ली सीपीआर' तंत्र आणि ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर उपकरणाच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. प्रात्यक्षिकांवर आधारित या उपक्रमात सहभागी होतांना प्रशिक्षणार्थींनी समाधान व्यक्त केले. उपक्रमाविषयी डॉ. सृष्टी विजन म्हणाल्या, हृदयाशी संबंधित आपत्कालीन परिस्थिती कुठेही येऊ शकते. घरी, शाळेत किंवा कामाच्या ठिकाणी ही घटना घडू शकते. जर जवळच्या व्यक्तीला सीपीआरचे ज्ञान असेल, तर ते जीवन आणि मृत्यूमधील महत्त्वाचा दुवा ठरू शकते. हे जीवनदायी कौशल्य प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत जागरूकतेचा भाग बनवणे हे आमचे ध्येय आहे. दरम्यान या कार्यक्रमाला सामाजिक जाणिवेची जोड देत नाशिक लेडीज सर्कलच्या अध्यक्षा शीतल रावल यांनी एका मुलाच्या शिक्षणासाठी सर्कलच्या वतीने निधीही दान केला. विजन हॉस्पिटलशी संलग्न असलेल्या विजन्स युनिक हेल्थकेअर फाउंडेशनने नाशिकमध्ये आरोग्य जनजागृतीसाठी मोठे काम केले आहे. ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. विनोद विजन आणि प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. विक्रांत विजन यांनी स्थापन केलेली ही संस्था "नाशिकला हृदय-सुरक्षित शहर बनवणे" या ध्येयासाठी अथक प्रयत्न करत आहे.

# वाडीवऱ्हे गटात माजी सभापती सोमनाथ जोशी यांचे नाव चर्चेत

**सर्वतिर्थ टाकेद ।** राजकीय दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या वाडीवऱ्हे गटाची जिल्हा परिषद, पंचायत समितीची आरक्षण सोडत पार प्रदीर्घ काळापासून रखडलेली होती. आरक्षण सोडत पार पडल्याने इच्छुक उमेदवारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. वाडीवऱ्हे गट अनुसूचित जमातीसाठी तसेच गण सर्वसाधारणसाठी राखीव झाल्याने निवडणूक अधिक रंगतदार होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

गटात आरक्षण जाहीर झाल्याने अनेकांनी गाठीभेटी घेण्यास प्रारंभ केला आहे. गोरगरिबांच्या सेवेशी नाळ जुळलेले आशाकिरणवाडी येथील रहिवासी असलेले इगतपुरी पंचायत समितीचे सभापती सोमनाथ जोशी यांचा या गटात दांडगा जनसंपर्क आहे. शिवसेना पक्षात सक्रिय असून पक्ष प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात वाडीवऱ्हे गटात ते इच्छुक असल्याचे समजते. 'वैताग वाडीला' तत्कालिन राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी भेट दिली होती. त्या गावाचे नाव आशाकिरणवाडी असे पडले. ह्या छोट्याशा



वाडीत जन्म झालेले सोमनाथ जोशी यांनी कमी वयात अगदी जवळून राष्ट्रपतींची भेट घेऊन समस्या मांडल्या होत्या. त्याची आठवण अजूनही जनतेच्या मनात कायम आहे. श्री जोशी यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणूक लढवावी अशी मागणी नागरिकांची आहे. आरक्षण सोडत जाहीर होताच मित्र, नातेवाईक, अनेकांनी संपर्क साधून व त्यांची भेट घेऊन आपणच नेतृत्व करावे असे सांगितले. सभापती असताना सोमनाथ जोशी यांनी नागरिकांचे अनेक प्रश्न सोडवले असून गरीब कुटुंबातील व्यक्तींना घरकुल योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. ते सुशिक्षित असून त्यांच्या माध्यमातून विकसनशील कामे होऊ शकतात असे मत नागरिकांनी मांडले. दिव्यांग बांधवांसाठी कॅम्प लावणे. त्यांना घरपट्टी सूट देणे, रोजगार निर्मिती साठी साहित्य देणे तसेच पंचायत समितीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम हाती घेतले. सभापती कार्यकाळात आरोग्य विभागासाठी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आहे. विधवा पेन्शन, निराधार पेन्शन, दिव्यांग पेन्शनचे कॅम्प घेऊन लाभ मिळवून दिला. २०१९ रोजी दिल्ली येथे २६ जानेवारीला तत्कालिन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे विशेष अतिथी म्हणून त्यांना आमंत्रण देऊन बोलावले होते.

# हंस योग साधना निसर्गोपचार संस्थेतर्फे दिवाळी फराळ वाटप



**नाशिक ।** हंस योग साधना निसर्गोपचार संस्था ऑफलाइन व ऑनलाईन योग वर्ग घेते. सर्वांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी या संस्थेचे ब्रीदवाक्य 'अपना इलाज अपने हात' आहे. या संस्थेद्वारे अनाथ व गरीबांना दिवाळ फराळ वाटप करण्यात आले.

हंस योग साधना निसर्गोपचार संस्थेचे संस्थापक भानुदास परबत व ऑनलाईन संस्थेचे योग साधक वर्ग यांच्या सर्वांच्या सहकार्यातून हे फराळ वाटप करण्यात आले. आधार तीर्थ अनाथ आश्रम व मुळेगाव आदिवासी पाड्यावर फराळ वाटप करण्यात आले. यासाठी योगाचार्य मनोहर कानडे, योग शिक्षक जयश्री पाटील, सृष्टी कानडे, रत्ना लाड, मयूर खैरे, दत्तात्रय पुंड, अभिलाष मुळे, शाम गव्हाणे, पार्थ लटके या सर्वांच्या सहकार्याने हे फराळ वाटप करण्यात आले.

# भाजपा दिव्यांग आघाडीतर्फे पुरस्काराचे आयोजन

## ब्रह्माकुमारी वासंती दीदी यांना 'जीवनगौरव'; बाळासाहेब सोनवणेंना 'दिव्यांगरत्न , समाजभूषण'

**नाशिक ।** भाजपा दिव्यांग विकास आघाडीच्यावतीने रविवार दि. १९ रोजी सकाळी ११ वा. प्रबोधनकार ठाकरे सभागृह,नवीन सिडको येथे दीपावलीनिमित्त दिव्यांग बांधवांना फराळ वाटप आणि विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

यावेळी अध्यात्मिक क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेच्या नाशिक जिल्हा मुख्य संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी यांना जीवनगौरव पुरस्कार. तर दिव्यांगांचे पुनर्वसन करणारे तसेच महिरावणी येथील मातोश्री गीताबाई देवराम पाटील विद्यालयाचे आदर्श उपक्रमशील उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे यांना दिव्यांगरत्न व समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यावेळी अनिल नहार, डॉ.अश्विन पारखे, माजी नगरसेवक राजेंद्र महाले, शिल्पा झारेकर, राजाराम





वाघ, सोनाली ठाकरे, अनिता भामरे, एडवोकेट नितीन पाटील, ललित पवार, योगेश मोरे, सचिन अग्रवाल, बाबूजी गुप्ता यांना समाजभूषण तर राजेंद्र शेळके, आकाश पगार, सतीश नांदोडे, गणेश ढेमसे, लक्ष्मण डोळस विलास पाटील या पत्रकारांना "पत्रकार भूषण" या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यावेळी पुरस्कारार्थींचा मानाचा फेटा, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी ब्रह्माकुमारी संस्थेच्या जिल्हा मुख्य संचालिका ब्रह्माकुमारी वासंती दीदी,आमदार सिमाताई हिरे, उद्योगपती बुधाजी पानसरे,भाजपा अध्यक्ष सुनील केदार, ज्येष्ठ समाजसेविका विमलताई आव्हाड आदी प्रमुख अतिथी उपस्थित राहणार आहेत.सर्वांनी उपस्थित राहून दिव्यांग बांधवांची दिपावाली द्विगुणीत करावी असे आवाहन बाळासाहेब घुगे आणि यमुनाताई बाळासाहेब घुगे यांनी केले आहे.

# विक्रांत मते यांनी मधुमेही बालकांना दिली दिवाळीची अनोखी भेट

## दिवाळी कशी साजरी करावी याचा आदर्श

**नाशिक ।** दिवाळी साजरी कशी करावी यासाठी अनेक सामाजिक संघटना आपापल्या परीने प्रयत्न करीत असतात. विशेषतः झोपडपट्टीमध्ये किंवा गरिबांच्या झोपडीत गोडधोड खायला मिळावे, म्हणून दिवाळीचे फराळ नेऊन दिले जाते. त्यामुळे तेथील बालकांच्या व कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंदाची एक वेगळीच छटा पाहायला मिळते. अगदी त्याचप्रमाणे नाशिकचे युवा नेते व माजी नगरसेवक विक्रांत मते यांनी दिवाळीचे औचित्य साधून दिडशे मधुमेही बाल रुग्णांना इन्शुलिन व मेडिकल किटचे मोफत वाटप केले.

महागड्या भेटवस्तू, शुभेच्छा देणारे फलक यावर खर्च न करता सामाजिक बांधिलकीतून त्यांनी दीडशे मधुमेही बाल रुग्णांना मोफत इन्शुलिन व मेडिकल किट वाटपाचा उपक्रम हाती घेतला. तसेच त्यांनी गेल्यावर्षी दोनशे लोकांचा विमा उतरवून दिलेले कवच हे त्यांचे सामाजिक कार्य गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ.





निलेश निकम यांनी याप्रसंगी व्यक्त केले. मधुमेही बालरुग्णांना मोफत मेडिकल किट वाटपाच्या कार्यक्रम प्रसंगी आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ.निलेश निकम बोलत होते. खरे तर विक्रांत मते हे करत असलेले कार्य खरोखरच कौतुकासाप्द असून मते परिवार नेहमीच निस्वार्थ गरजूंची मदत करत असतात. विक्रांत मते यांनी राबविलेल्या उपक्रमाचे त्यांनी कोतूक केले. यावेळी प्रास्ताविकात विक्रांत मते यांनी व आपण दिवाळी निमित्ताने होणाऱ्या खर्चास फाटा देवून दरवर्षी गरजूंना मदत करण्याचे उपक्रम राबवित असतो. यावेळी आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ. निलेश निकम, उपाध्यक्ष डॉ. मनीषा जगताप, 'महासागर'चे संपादक प्रा. जयंत महाजन, मधुमेह तज्ञ डॉ.तुषार गोडबोले व डॉ. यशपाल गोगटे यांनी कार्यक्रमाचा हेतू आपल्या भाषणात सांगतांना विक्रांत मते यांच्या उपक्रमाचे अनुकरण इतर सामाजिक संस्थानी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर प्रकाश मते होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सोपान एरंडे यांनी केले. तुषार ठाकरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दक्षता अभियानच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

### असा नगरसेवक होणे नाही

राजकारणापेक्षा समाजा सेवेमध्ये रस असलेल्या विक्रांत मते यांची कामगिरी






नाशिकमध्ये चर्चेला आली आहे. डोळ्यासमोर कोणताही हेतू न ठेवता वेगवेगळे प्रयोग समाजाच्या हितासाठी ते राबवितात. नगरसेवक असताना गोदावरी स्वच्छते अंतर्गत पाण्यावरील घंटागाडी सुरू केली होती. कोरोना काळात पेशंटला मोफत ऑक्सिजन कीट तसेच गरजूंना अन्न कपडे ब्लँकेट व धान्य वाटप केले होते. आडगाव येथील मेडिकल कॉलेज येथे स्वस्त पुरीभाजी केंद्र सुरू केले. तेथे दररोज ५०० पेक्षा जास्त रूग्ण व नातेवाईक लाभ घेतात. राजश्री शाहू व इंजिनिअरिंग कॉलेज मधील गरीब विद्यार्थ्यांना फी भरण्यासाठी हातभार लावला. गरीब व हुशार, होतकरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मोफत लॅपटॉप बँक सुरू केली. बोटक्लबद्वारे खेळाडूंना सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच बाल रुग्णांना मोफत मेडिकल किटचे वाटप यासारखा उपक्रम राबविण्याचा त्यांचा मनोदय असतो. या वर्षी डॉ.तुषार गोडबोले, डॉ. यशपाल गोगटे यांच्या मार्गदर्शनाखाली गरजु मधुमेहीग्रस्त बाल रुग्णांची निवड केली. त्यानुसार हा उपक्रम राबविला. या पुढेही आपण असेच सामाजिक उपक्रम राबविणार असल्याचे विक्रांत मते यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### देवळाली कॅम्पला पुन्हा बिबट्या जेरबंद



**नाशिक ।** देवळाली कॅम्प परिसरात दहशत माजविणारे बिबटे पकडण्याचा वन खात्याचा सिलसिला सुरूच असून, सोमवारी पहाटे बार्न स्कूलजवळ लावलेल्या पिंजऱ्यात चार वर्षे वयाचा नर बिबट्या जेरबंद झाला आहे. देवळाली कॅम्प, पिंपळगाव खांब या भागात बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता नागरिकांमध्ये भयभयीत वातावरण आहे. गेल्या दिड महिन्यांपासून वन खात्याकडून बिबट्यांना पकडण्यासाठी जागोजागी पिंजरे लावले आहेत. त्यात आत्तापर्यंत सात बिबटे जेरबंद करण्यात यश आले आहे. सोमवारी (दि.२०) पहाटे देवळाली कॅम्पच्या बार्न स्कूल, ज्युनिअर कॉलेज परिसरात लावलेल्या पिंजऱ्यात भक्ष्याच्या शोधात आलेला बिबट्या सापडला आहे. वन खात्याला याची खबर मिळताच त्यांनी तात्काळ धाव घेत बिबट्याला ताब्यात घेतले. हा बिबट्या चार ते पाच वयाचा असल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी सुमीत निर्मळ यांनी दिली आहे.

### शिंदे सेनेची धुरा सुहास कांदेंच्या हाती; जिल्हा संघटकपदी नेमणूक



**नाशिक ।** शिंदे सेनेत स्थानिक व जिल्हा पातळीवर पदाधिकाऱ्यांमध्ये बेबनाव व पदाधिकाऱ्यांची गटबाजी लक्षात घेता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत पक्ष शिस्त तसेच संघटन बळकट करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार सुहास कांदे यांची जिल्हा संघटकपदी नेमणूक केली आहे. सध्या नाशिक जिल्ह्याची जबाबदारी सचिव भाऊसाहेब चौधरी, राम रेपाळे, उपनेते व जिल्हा प्रमुख अजय बोरस्ते, जिल्हा संपर्कपदी विजय करंजकर, सहसंपर्क प्रमुखपदी राजू लवटे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यातील प्रत्येक नेत्याचे विविध गट कार्यरत असून, त्यातून संघटनेतील बेबनाव वेळोवेळी समोर आला आहे. त्यामुळे पक्ष संघटनेकडे पदाधिकाऱ्यांचेच दुर्लक्ष झाल्याची भावना शिवसैनिक व्यक्त करू लागले होते. अशातच स्थानिक स्वराज्य संस्था व महापालिकेची निवडणूकीचे वातावरण तापण्यास सूरूवात झाली आहे. अशात पक्षात शिस्त व गटबाजीला आळा घालण्यासाठी आमदार सुहास कांदे यांना पक्षाने बळ दिले आहे. कांदे हे भुजबळांचे कट्टर विरोधक मानले जातात. त्यांच्या पक्ष संघटनेतील समावेशामुळे सामान्य शिवसैनिकांना बळ मिळण्याची शक्यता गृहीत धरून कांदे यांची जिल्हा संघटकपदी नेमणूक करण्यात आली आहे.

### 'त्या' तिघांची आत्महत्या; कर्मभूमी एक्सप्रेसच्या पायलटचे स्पष्टीकरण

**नाशिक ।** लोकमान्य टर्मिनसहून बिहार कडे जाणाऱ्या कर्मभूमी एक्सप्रेसमधून तिघे जण पडल्याची घटना शनिवार (दि.१९) समोर आली होती. यातील दोन जणांचा जागीच मृत्य झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. सुरुवातीला ट्रेनमधील गर्दीमुळे हे तिघे जण खाली पडल्याची चर्चा होती, परंतु आता या घटनेला वेगळे वळण मिळाले आहे. ट्रेनमधून पडून नाहीतर ट्रेन समोर या तिघांनी आत्महत्या केली, अशी माहिती ट्रेनचे लोकोपायलट एस.देटे यांनी ओढा रेल्वे स्थानकात दिली आहे. कर्मभूमी एक्सप्रेसने दिवाळीसाठी हे तरुण बिहारला जात होते. गाडीला जास्त गर्दी असल्याने तिघे जागेच्या कमतरतेमुळे खाली पडल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. परंतु लोको पायलट दिलेल्या माहितीमुळे या घटनेचा उलगडा झाला असून आत्महत्या का केली याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

### महाराष्ट्र हास्ययोग संघाची सावली वृद्धाश्रमात दिवाळी

**नाशिक ।** महाराष्ट्र हास्ययोग संघ, नाशिक शाखेतर्फे सुनील कोटगी यांच्या उपस्थितीत या वर्षी




दिवाळी विशेष उपक्रम म्हणून संघातील क्रियाशील व मदतगार सदस्यांनी सावली वृद्धाश्रम येथे भेट देऊन तेथील वृद्धांबरोबर दिवाळीचा जल्लोष साजरा केला. संघाच्या विविध हास्य क्लबमधून वृद्धाश्रमासाठी दैनंदिन गरजांच्या वस्तू आणि किराणा साहित्य गोळा करण्यात आले. मूळ उद्दिष्ट होते की एका महिन्यापुरते साहित्य भेट द्यावे, परंतु सदस्यांच्या अपार उत्साहामुळे जवळपास तीन महिन्यांचा साठा जमा झाला. सावली वृद्धाश्रमाचे संचालक यांनी महाराष्ट्र हास्ययोग संघ, नाशिकच्या सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि या सेवेबद्दल विशेष कौतुक केले. याप्रसंगी सुनील कोटगी म्हणाले, हास्य ही फक्त औषध नव्हे तर एक संस्कार आहे. दिवाळी फक्त दिवे लावण्याची नव्हे, तर कोणाच्या आयुष्यात उजेड आणण्याची संधी आहे. सहभाग घेतलेल्या सर्व हास्य क्लबचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व क्रियाशील सदस्य यांचे उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला हा उपक्रम सामाजिक जबाबदारीसोबत मानवी संवेदनांचा सुंदर संगम ठरला असून, पुढील काळातही महाराष्ट्र हास्ययोग संघ असे अनेक जनहितार्थ उपक्रम राबवणार असल्याचे निवृत्त बी.एस.एन.एल. जनसंपर्क अधिकारी गणेश बोरसे यांनी सांगितले.

# दोन दिवसांत पाणी नाही तर गंगापूर धरणावर आंदोलन

## अमोल पाटीलांचा इशारा । जलशुद्धीकरण केंद्रात डेन्सिटी नोंद १३ ऑगस्टपासून गायब



**नाशिक ।** जिल्ह्यासह मराठवाड्याचीही तहान भागवणारे गंगापूर धरण ओसंडून वाहत असतानाही नाशिक शहर परिसरात मानवनिर्मित पाणी टंचाईची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे, संपूर्ण शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्रावर अधिकारी कर्तव्य टाळून मजुरांकडून पाणी सोडण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम करून घेत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

यासोबतच, क्लोरीन मिसळणाऱ्या टाकीचा स्लॅप कोसळल्याने नाशिककरांचे आरोग्य अक्षरशः धोक्यात आले आहे, अशी भीषण परिस्थिती समोर आली आहे. येत्या दोन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत झाला नाही तर गंगापूर धरणावर आंदोलन करण्याचा इशारा अमोल पाटील यांनी दिला आहे.

प्रभाग क्रमांक ९ मधील शिवाजीनगरवासियांसाठी 'धरण उशाशी, मात्र कोरड घशाशी' अशी परिस्थिती आहे. गेल्या दोन महिन्यांपासून या भागात पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. माजी नगरसेविका लता पाटील, माजी नगरसेवक रवींद्र धीवरे आणि ऊर्जा युवा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष अमोल पाटील यांनी पाणीपुरवठा अधिकारी रवींद्र धारणकर व अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांना निवेदन दिले होते. या समस्येची गांभीर्यता तपासण्यासाठी अमोल पाटील यांनी सातपूर विभागाचे उपअभियंता विनायक गांगुर्डे आणि कनिष्ठ अभियंता साहेबराव राऊत यांना बोलावले होते.

**अधिकाऱ्यांची पोलखोल!**

शनिवारी पहाटे पाच वाजताच छत्रपती शिवाजीनगर धृवनगर श्रमिकनगर भागातील पाणीपुरवठ्याची पाहणी करताना या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागले. अनेक भागांत नळाला पाणीच नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्वतः मान्य केले. पाण्याच्या टाकीवरून पाणी सोडलेले असतानाही पाणीच नसल्याचे उघड झाल्यावर 'वालमन'च्या कामात त्रुटी आढळल्याने वालमनवर कारवाई करण्याचे आश्वासन उपअभियंता विनायक गांगुर्डे यांनी दिले आहे. येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास गंगापूर धरणावर आंदोलन करण्याचा इशारा अमोल पाटील यांनी दिला आहे. 'पाणी कुठे मुरतेय' हे शोधण्यासाठी अमोल पाटील आणि अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजीनगर जलशुद्धीकरण केंद्र गाठले, तेव्हा अधिकच धक्कादायक वास्तव समोर आले. या केंद्रावरील क्लोरिन मिक्स करणाऱ्या टाकीचा स्लॅप (छत) कमकुवत होऊन काही भाग कोसळला असल्याचे दिसून आले! जलशुद्धीकरणाच्या अतिमहत्त्वाच्या टप्प्यात ही गंभीर त्रुटी आढळल्याने महापालिका अक्षरशः नाशिककरांच्या जीवाशी खेळत असल्याचे स्पष्ट झाले आहे. येथील कर्मचाऱ्यांनी इतर स्लॅपही कमकुवत झाल्याचे सांगितले आहे. या जलशुद्धीकरण केंद्रावर अनेक तांत्रिक अधिकारी व कर्मचारी नियुक्त असताना ते कामावर वेळेवर उपस्थित नसल्याचे उघड झाले आहे. केंद्रावर सुरक्षारक्षक फक्त रात्रपाळीलाच उपलब्ध असून दिवसाची सु रक्षा 'रामभरोसे' असल्याचंही निदर्शनास आलं आहे. तीन सुरक्षारक्षकांची मागणी असताना एकाच सुरक्षारक्षकावर कामभागवले जात आहे.

# भाजपच्या माजी नगरसेवक संगिता गायकवाड यांचा ठाकरे गटात प्रवेश



**नाशिक ।** महापालिका निवडणूकीच्या तोंडावर ठाकरे गटात इन्कमिंग सुरू झाले असून, भाजपाच्या नगरसेविका संगिता गायकवाड, हेमंत गायकवाड आदींनी सोमवारी मातोश्रीवर जावून ठाकरे गटाचे शिवबंधन बांधले. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा झाल्याने भाजपाला मोठा धक्का बसला आहे. येत्या काही दिवसात आणखी मोठे प्रवेश होणार असल्याचे उपनेते दत्ता गायकवाड यांनी सांगितले.

राज्यात दोन्ही ठाकरे बंधूंची महापालिका निवडणूकीत युती होणार असल्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे शिवसेना व मनसेत उत्साहाचे वातावरण आहे. दुसरीकडे शिंदे सेनेतील इन्कमिंग थांबली असून, भाजपातही मोठी भरती झाल्याने विद्यमान आमदारांना निवडणूकीत तिकीट मिळण्याची शाश्वती राहिलेली नाही. ठाकरे गटात दोन वर्षात मोठी पडझड होवून अनेकांनी शिंदे सेनेची पायरी गाठली. परंतु आता राजकीय चित्र बदलू लागल्याने ठाकरे गटात उत्साह व्यक्त केला जात आहे. अशातच भाजपाच्या नगरसेविका संगिता गायकवाड, भाजपाचे पदाधिकारी हेमंत गायकवाड, प्रा. डॉ.लक्ष्मण सुरेश शेंडगे, किमया विवेक बागुल रोहिणी उखाडे, प्रवीण पाटील, अंकुश अशोक व्हावल, सिमा ललवाणी, बबीता मोरे, सुजाता गोजरे, सुजाता गवांदे, कांचन चव्हाण, जयकुमार ललवाणी, सत्यम खोले यांनी ठाकरेंच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला. यावेळी उपनेते दत्ता गायकवाड, जिल्हा प्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख प्रथमेश गीते, माजी आमदार वसंत गीते, विनायक पांडे, मसूद जिलानी, भारती ताजनपुरे, स्वाती पाटील आदी उपस्थित होते.

# लोंढे टोळीतील निखिल निकुंभ ताब्यात



**नाशिक ।** सातपूर येथील गोळीबार प्रकारणी माजी नगरसेवक प्रकाश लोंढे व पूत्र दिपक लोंढे हे पोलीसांच्या ताब्यात असतांना गुन्हे शाखेने गेल्या पंधरा दिवसांपासून फरार असलेला निखील मधुकर निकुंभ (रा. खुटवडनगर) हा संशयित ठाण्याच्या मिरा भाईंदर येथे दडून बसल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी कोणाचाही मुलाहिजा न ठेवता गुन्हेगारांची धरपकड सुरू केली आहे. अनेकांना पोलीस कोठडीत तर काहींना तुरूंगाची हवा खावी लागली आहे. अशातच सातपुर येथे हॉटेलच्या बाहेर गोळीबार करून फरार झालेला निखील निकुंभ हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. गुन्हे शाखेने त्याच्या शोधासाठी कसब पणाला लावली असतांना ठाणे जिल्ह्यात निकुंभ दडून बसल्याची खबर लागल्याने मिरा भाईंदर येथील केनवूड टॉवर सोसायटी येथे जावून त्याला बेड्या ठोकल्या. त्याच्यावर खुनाचा प्रयत्न करणे, अंबड पोलीस ठाण्यातील खंडणी प्रकरणासह सहा गंभीर गुन्ह्याची नोंद आहे.

# विनयनगर येथे सांज सुरेल गीतांची मैफील संपन्न





**नाशिक ।** दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर प्रभाग २३ चे माजी नगरसेवक यशवंत निकुळे, माजी नगरसेविका रुपाली निकुळे व विनय नगर ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने दीपावली सांच मैफिलीचे आयोजन जयप्रकाश छाजेड उद्यानामध्ये रविवारी (दि१९) सायंकाळी करण्यात आले होते.

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक ज्ञानेश्वर मेश्राम (माऊली), पार्श्वगायिका खुशी भोजक यांनी कानडा राजा पंढरीचा, चला जेजुरीला जाऊ, कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी, राधा ही बावरी आदी सुप्रसिद्ध भक्तीगीते भजन, हिंदी, मराठी गीते सादर करत रसिक श्रोत्यांची मने जिंकली. त्यांना गायक अर्जुन तांबे, गायिका मिनल धोडपकर, की बोर्ड अनिल धुमाळ, तबला महेश धोडपकर, ऑक्टोपॅड देवानंद पाटील, प्रतीक पाटील यांनी साथ दिली. तर सूत्रसंचालन सचिन जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मध्य विधानसभेच्या आमदार प्रा.देवयानी फरांदे उपस्थित होत्या. या ठिकाणी सुसज्ज असे उद्यान उभारले गेले आहे. त्यातच आज पहिल्यांदाच दीपावलीच्या पूर्वसंध्येला सुरेख अशा सांज मैफलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन करणारे माजी नगरसेवक यशवंत व रुपाली निकुळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केल्याने त्यांचे आभार मानण्यात आले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष सुनील केदार, सुनील फरांदे, माजी महापौर सतीश कुलकर्णी, माजी नगरसेवक चंद्रकांत खोडे, संदीप लेंडकर, ॲड श्याम बडोदे, अर्चना थोरात, शाहीन मिर्झा, दिपाली कुलकर्णी, सुप्रिया खोडे, योगेश म्हस्के, सुनील खोडे आदी मोठ्या संख्येने उपस्थितहोते.

# नाशिक विमानतळावरील नवीन धावपट्टी सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी कार्यान्वित करा

## मंत्री भुजबळ यांची केंद्रीय संरक्षण मंत्र्यांकडे मागणी

**नाशिक ।** नाशिक विमानतळावर उभारण्यात येत असलेली ३००० x ४५ मीटर लांबीची नवीन धावपट्टी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ पूर्वी कार्यान्वित करून नागरी विमान सेवेसाठी परवानगी देऊन सुरू करण्यात यावी अशी मागणी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना दिलेल्या पत्रात केली आहे.

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की. नाशिक विमानतळावर ३००० x ४५ मीटर लांबीची नवीन धावपट्टी निर्माण करण्यात येत आहे. सिंहस्थ कुंभमेळा २०२७ पूर्वी नाशिक विमानतळावर नवीन धावपट्टी नागरी विमानांच्या ऑपरेशन्ससाठी वापरण्याची परवानगी देऊन ती तातडीने सुरू करण्याची नितांत गरज आहे. नाशिक विमानतळ हे हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या मालकीचे असून ते चालवले जाते. या २२ एकरांवर पसरलेल्या ८,२६७ चौ.मी. बिल्ट-अप क्षेत्रफळ असलेल्या नाशिक विमानतळ टर्मिनल इमारतीत आधीच ग्राउंड लाइटिंग सुविधा, इन्स्टुमेंट लँडिंग सिस्टम आहे. नाशिक भूमी हे आध्यात्मिक तीर्थक्षेत्रासाठी एक पवित्र स्थान आहे. कुंभमेळा हा सर्वात मोठा पवित्र उत्सव आहे ज्यामध्ये ५ कोटींहून अधिक भाविक नाशिकमध्ये पवित्र स्नानासाठी गोदावरीच्या काठावर गर्दी करतील अशी अपेक्षा आहे. कुंभ हा केवळ एक धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम नाही तर जगातील एक ज्योतिषीय, सांस्कृतिक आणि खगोलशास्त्रीय कार्यक्रम आहे. कुंभमेळा ज्ञानाच्या प्रकाशाचा स्रोत मानला जातो जिथे भाविक आध्यात्मिक साधक होण्यासाठी आणि शाश्वत आत्म-साक्षात्कारासह सकारात्मक लहरी अनुभवण्यासाठी येतात. कुंभमेळा हा खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, पवित्रता, धार्मिक रीतिरिवाज आणि सामाजिक-सांस्कृतिक रीतिरिवाज आणि निरीक्षणाचे विज्ञान एकत्र आणणारा उत्सव असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे सिंहस्थ कुंभमेळा २०२७ पूर्वी नाशिक विमानतळावर नवीन ३००० x ४५ मीटर धावपट्टी सुरू करण्यासाठी व्यापक आढावा घेऊन नागरी विमान ऑपरेशन्ससाठी त्याचा वापर करण्याची परवानगी द्यावी. त्यातून नाशिकला एअर कनेक्टिव्हिटी वाढविण्यात खूप मदत होईल असे मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

# ज्येष्ठांचा सल्ला खूप उपयोगी पडतो : बडगुजर

## बडगुजर दांपत्याची ज्येष्ठांसमवेत दिवाळी साजरी



**नाशिक ।** भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधाकर बडगुजर आणि ज्येष्ठ माजी नगरसेविका हर्षा बडगुजर यांनी ज्येष्ठ नागरिकांसमवेत दीपावलीचा सण साजरा करून त्यांचे आशीर्वाद घेतले. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, महानगराध्यक्ष सुनील केदार उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिक ही देशाची संपत्ती असून त्यांच्या संस्कारावरच भावी पिढी तग धरून आहे. कोणताही उपक्रम राबवताना किंवा निर्णय घेताना ज्येष्ठांचा सल्ला मला खूपच उपयुक्त ठरतो,असे सुधाकर बडगुजर यांनी आपल्या मनोगतात सांगितले. लक्ष्मण सावजी आणि सुनील केदार यांनी ज्येष्ठांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून भावी पिढी घडविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावण्याचे आवाहन त्यांना केले.यावेळी सर्व ज्येष्ठ नागरिकांना मिठाईचे वाटपही करण्यात आले.

सुधाकर बडगुजर यांनी आम्हाला अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या असून आमची ते सातत्याने विचारपूस करीत असतात. आम्हाला ते कुटुंबातील एक सदस्य समजतात. आमच्या आरोग्याचीही ते सातत्याने काळजी घेतात आणि म्हणूनच त्यांचे कार्य खुलून दिसते असे श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघांचे अध्यक्ष जगन्नाथ कुऱ्हे, शिवसेनेचे माजी महानगरप्रमुख देवानंद बिरारी, दिलीप दातीर, शीला भामरे, संजय भामरे कैलास चुंबळे, मनोहर बोराडे, प्रकाश अमृतकर, गोकुळ नागरे, सुरेश होळकर, साधना मटाले, नंदिनी जाधव, गोपी गिलबिले, सुरेश होळकर,ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष नानासाहेब निकम, सचिव गोपीनाथ सोनवणे, जगन्नाथ मालपुरे, सुभाष अमृतकर, यशवंत गायकवाड, कृष्णा शिरसाट, सुरेश बोरसे, कौतिक शेळके, सुरेश बोरसे, गोविंद ठाकूर, दत्तात्रय पितळे, हरिभाऊ आढाव आदी उपस्थित होते.

# कै. बाळासाहेबांचे आयुष्य हे समाजसेवेचे एक अखंड विद्यापीठ : मंत्री भुजबळ



**नाशिक ।** शिक्षण, सहकार, जलसंधारण, पर्यावरण, समाजसेवा यासह विविध क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे कै.बाळासाहेब वाघ यांचं आयुष्य हे समाजसेवेचे एक अखंड विद्यापीठ होते. कै.बाळासाहेब वाघ यांनी निर्माण केलेल्या संस्था, मूल्ये आणि विचार हेच त्यांचे खरे स्मारक आहेत. या महाराष्ट्र धुरिणींच्या विचारांवर आपण सर्वांनी वाटचाल करायला हवी असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. कै.बाळासाहेब देवराम वाघ यांच्या ९३ व्या जयंती निमित्त के.के.वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, मैदान नाशिक येथे जयंती कार्यक्रम पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कै.बाळासाहेब वाघ यांना आदरांजली वाहत मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, शिक्षण हे अतिशय महत्वाचे असल्याने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी बहुजन समाजातील नागरिकांना शिक्षणाची कवाड खुली करून दिली. त्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या कार्याचा वसा घेऊन महाराष्ट्रातील धुरीणांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना चांगलं शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये पद्मश्री काकासाहेब वाघ, कै.बाळासाहेब वाघ यांचे नेतृत्व आहे. के.के.वाघ शिक्षण संस्थेचे वटवृक्ष त्यांनी निर्माण केलं. या समाज धुर्मिणींनी जे काम केलं त्यांच्या विचारांवर आपल्या सर्वांना पुढे जायला हवे असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, कै.वाघ साहेब हे नाव फक्त नाशिक जिल्ह्यासाठीच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरले. त्यांनी आयुष्यभर त्यांनी प्रत्येक क्षण समाजाच्या सेवेच्या, शिक्षणाच्या आणि सहकाराच्या उन्नतीसाठी समर्पित केला. त्यांच्या नेतृत्वाखाली के.के.वाघ शिक्षण संस्था आज महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठित शैक्षणिक समूहांपैकी एक झाली. कै.वाघ यांनी नेहमीच सांगितले कि, "शिक्षण हे फक्त पदवी मिळवण्यासाठी नसते, ते माणूस घडवण्यासाठी असते." हे त्यांचे तत्त्वज्ञान प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मसात केले. त्यांनी संस्थेला केवळ शाळा-महाविद्यालयांच्या स्वरूपात वाढवले नाही, तर मूल्याधिष्ठित शिक्षणसंस्कृती रुजवली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभाताई बच्छाव, खासदार भास्कर भगरे, आमदार दिलीप बनकर, श्रीमती शंकुतला वाघ, माजी खासदार प्रतापराव वाघ, माजी आमदार नितीन भोसले, चांगदेवराव होळकर, राजाराम पानगव्हाणे, शरद आहेर, डॉ.सुनील.ढिकले, अरविंद कारे , माणिकराव बोरस्ते, डॉ.दिनेश बच्छाव, डॉ.अनिवृद्ध धर्माधिकारी, अशोक वाघ, अमोल कोल्हे, सुरेश खेताडे, लक्ष्मण सावजी, डी. के.जगताप, राजेंद्र डोखळे, ॲड. लांडगे, ॲड. इंद्रभान रायते, सुरेश भोज, गजानन शेलार, संजय होळकर, के.के.वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक अजिंक्य वाघ, संस्थेचे सचिव के.एस.बंदी, डॉ. व्हि. के.पाटील, के.एन.नांदुरकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार दिलीप बनकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर संस्थेचे संचालक अजिंक्य वाघ यांनी आभार मानले.

# दिवाळी पुराण आणि इतिहास



**दिवाळी** संदर्भात असलेल्या गमतीदार माहितीने पुराणात तसेच इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच हा सण एखाद्या विशिष्ट समूहाचा न राहता संपूर्ण राष्ट्राचा बनला आहे. दिवाळीविषयी काही रंगतदार व गमतीदार माहिती खालीलप्रमाणे:-

- प्रभू राम रावणाचा पराभव केल्यानंतर अयोध्येला परतत असताना त्यांच्या वाटेवर लोकांनी दिवे लावून स्वागत केल्याचे त्रेतायुगात सांगितले आहे.
- श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध केल्यानंतर गोकुळवासियांनी आपला आनंद दिवे लावून व्यक्त केल्याची कथा प्रचलित आहे.
- देवीने महाकालीचे रूप धारण करून राक्षसांचा वध केला होता. त्याचा वध केल्यानंतरही महाकालीचा क्रोध कमी झाला नव्हता, तेव्हा भगवान शंकराने स्वत: देवीच्या चरणी लोटांगण घातले. शंकराच्या शरीर स्पर्शाने महाकालीचा क्रोध शांत झाला. त्याची आठवण म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाते. या दिवशी तिच्या रौद्ररूपाची पूजा करण्याची प्रथा आहे.
- बळीराजाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर त्रैलोक्यावर विजय मिळविला होता. या विजयाने भयभीत झालेल्या देवांनी भगवान विष्णूची प्रार्थना केली. त्यांची प्रार्थना ऐकून विष्णूने वामन रूप धारण करून बळी राजाला तीन पायांत दान मागितले. विष्णूने तीन पायाने त्र्यैलोक्य घेतले. बळीच्या दानशूरपणामुळे प्रसन्न झालेल्या विष्णूने त्याला पाताळाचे राज्य देवून भू-लोकवासी त्याच्या आठवणीनिमित्त प्रत्येक वर्षी दिवाळी साजरी करतील असे आश्वासन दिले.
- शिखांचे सहावे गुरू हरगोविंदसिंग बादशाह जहांगीरच्या कैदेतुन सुटून कार्तिक अमावस्येच्या दिवशी अमृतसरला आले होते.
- दिवाळीच्या एक दिवस अगोदर म्हणजे चतुर्थीला श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला होता. यामुळे आनंदी झालेल्या गोकुळवासियांनी दुसऱ्या दिवशी अमावस्येला दिवे लावून आनंद साजरा केला होता.
- इसवी सन पूर्व ५०० वर्षापूर्वी मोहेंजोदडो येथे सापडलेल्या अवशेषांमध्ये एका मातीच्या मूर्तीनुसार त्याकाळी दिवाळी साजरी केली जात असल्याचे समजते. मूर्तीच्या दोन्ही बाजूला दिवे जळताना दिसून येत होते.
- इसवी सन पूर्व २५०० वर्षांपूर्वी गौतम बुद्धांच्या अनुयायांनी त्यांच्या स्वागतासाठी लाखो दिवे लावून दिवाळी साजरी केली होती.
- सम्राट विक्रमादित्याचा राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्याच दिवशी दिवे लावून जनतेने आनंद साजरा केला होता.
- इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील कौटिल्य अर्थशास्त्रानुसार कार्तिक अमावस्येच्या दिवशी मंदिरात आणि घाटावर (नदी किनारी) मोठ्या प्रमाणात दिवे लावले जात असल्याचे सांगितले आहे.
- अमृतसर येथील सुवर्णमंदिराचे बांधकाम दिवाळीच्या दिवशी सुरू झाले होते.
- जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांनी दिवाळीच्या दिवशीच बिहारमधील पावापुरी येथे आपल्या शरीराचा त्याग केला होता. 'महावीर सवंत' त्यांच्या दुसऱ्या दिवशी सुरू होते. त्यामुळे अनेक प्रांतातील लोक याला नवीन वर्षाची सुरवात मानतात. प्राचीन जैन ग्रंथात दीपोत्सवाचे वर्णन आहे. महावीर निर्वाणामुळे जी अंर्तज्योती कायमची विझून गेली होती, तिची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण बर्हिज्योतीचे प्रतीक म्हणून दिवे लावू या असे कल्पसूत्रात सांगितले आहे.

१३. पंजाबमध्ये जन्मलेल्या स्वामी रामतीर्थ आणि महाप्रयाण या दोघांचा जन्म दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्यांनी दिवाळीच्या दिवशी गंगाकिनारी स्नान करताना 'ओम' म्हणून समाधी घेतली होती.

# प्रकाशोत्सव दीपावली



दीपोत्सव म्हणजे आनंद, उत्साहाने साजरा करण्यात येणारा प्रकाशाचा उत्सव होय. दीपोत्सव हा केवळ उत्सव नसून उत्सवांचे स्नेहसंमेलन आहे. दिवाळी, नरकचतुर्थी, धनत्रयोदशी, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज या पाच सांस्कृतिक विचारधारा असलेल्या सणांचा उत्सव आहे.

धनत्रयोदशी म्हणजे लक्ष्मी पूजन! भारतीय संस्कृतीत लक्ष्मीला महत्त्वाचे स्थान आहे. 'सुईला छेदल्यास तिच्यातून उंट निघतो. परंतु, धनवंताला स्वर्ग मिळत नाही. या ख्रिश्चन धर्मातील म्हणीला भारतीय सहमत नाहीत. त्यांच्या दृष्टीकोनातुन श्रीमंत लोकच देवाचे लाडके असतात.

लक्ष्मी चंचल नाही तर मनुष्याची वृत्ती चंचल आहे. पैसा या शक्तीच्या आधारे मनुष्य देव किंवा राक्षस बनू शकतो. लक्ष्मी केवळ उपभोगाचे साधन आहे असे मानणाऱ्या मनुष्याचे लवकरच अध:पतन होते. परंतु, तिची पूजा करून तिला परमेश्वरी प्रसाद मानणारा मनुष्य स्वत: पवित्र आणि सृष्टीलाही पवित्र बनवितो. वाममार्गाने वापरलेल्या लक्ष्मीची अलक्ष्मी होते. स्वार्थ आणि परमार्थासाठी वापरलेल्या लक्ष्मीला वित्त आणि धनलक्ष्मी असे म्हणतात. देवकार्यासाठी वापरलेली लक्ष्मी महालक्ष्मी असते.

महालक्ष्मी हत्तीवर बसून सजून येते. हत्ती औदार्याचे प्रतीक आहे. सांस्कृतिक कार्यात उदारपणे लक्ष्मीचा वापर करणाऱ्यांजवळ पिढ्यान-पिढ्या ती राहते. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रघुवंश होय. ती एक महान शक्ती असल्यामुळे नेहमी चांगल्या लोकांच्या हातात राहिली पाहिजे. कारण तिचा चांगला उपयोग होऊ शकतो.

नरक चतुर्थीला महाकालीची पूजा केली जाते. स्वत:च्या स्वार्थासाठी शक्ती खर्च करणारा दुर्योधन, दुसऱ्याच्या चरणी शक्ती ठेवणारा कर्ण आणि देवकार्यात शक्तीचे हवन करणारा अर्जुन या महाभारतातील तीन पात्रांना महर्षी व्यासांनी उत्कृष्टपणे आपल्यासमोर मांडले आहे. नरकचतुर्थीला कालचतुर्थी असेही म्हणतात. त्यामागे अशी कथा आहे की, नरकासूर नावाच्या राक्षसाने पृथ्वीवर अत्याचाराचे थैमान मांडले होते. त्याच्या अत्याचारापासून स्त्रियांचीदेखील सुटका झाली नव्हती. त्याने सोळा हजार स्त्रियांना बंदी करून ठेवले होते. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने त्याचा वध करण्याचा विचार केला. श्रीकृष्णाच्या मदतीने सत्यभामेने नरकासूराचा वध करून स्त्रियांचा उद्धार केला. अमावस्येच्या त्या रात्री सर्व लोकांनी दिवे लावून आनंदोत्सव साजरा केला होता.

दिवाळी म्हणजे वैश्यांच्या (व्यापाऱ्यांच्या) हिशोब-वही पूजेचा दिवस! संपूर्ण वर्षाचे लेखा परिक्षण करण्याचा दिवस होय. या दिवशी मनुष्यानेही त्याच्या जीवनाचा लेखा-जोखा तयार केला पाहिजे. राग, द्वेष, मत्सर यांना दूर करून नवीन वर्षाच्या दिवशी प्रेम, श्रद्धा आणि उत्साह वाढविण्याचा प्रयत्न करावा.

**बलिप्रतिपदा (पाडवा):**

नवीन वर्षाला बलिप्रतिपदा असेही म्हटले जाते. वैदिक विचारांची उपेक्षा करून वर्णाश्रम व्यवस्थेला उध्वस्त करणाऱ्या बळीचा विष्णूने पराभव केला होता. म्हणून त्याच्या स्मरणार्थ बलिप्रतिपदा साजरी केली जाते. बळी दानशूर राजा होता. या दिवशी त्याच्या आठवणींना उजाळा दिला जातो.

दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीकडे पूज्य दृष्टीने पहावे. भाऊबीजेच्या दिवशी समस्त स्त्रियांकडे आई किंवा बहिणीच्या नजरेने पाहिले पाहिजे. स्त्री ही आदरणीय आहे. मोह म्हणजे अंधकार! दीपोत्सव म्हणजे अज्ञान आणि मोहाच्या खोल अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे प्रयाण करणे होय. दिवाळीला दिवे बाहेर जळतात. परंतु आपल्या मनात योग्य दीप प्रकट झाला पाहिजे. मनात अंधकार असल्यास बाहेर जळणारे दिवे निरर्थक ठरू शकतात. दीपक ज्ञानाचा प्रतीक आहे.

# धनत्रयोदशी आणि धन्वंतरि जयंतीचे महत्त्व

आश्विन वद्य त्रयोदशी या तिथीला धनत्रयोदशी (धनतेरस) हा सण साजरा केला जातो. दीपावलीला जोडून येणाऱ्या या सणाच्या निमित्ताने नवीन सुर्वणालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. व्यापारीवर्ग आपल्या तिजोरीचे पूजनही याच दिवशी करतात. धनत्रयोदशी म्हणजेच देवतांचा वैद्य धन्वंतरी देवता' यांची जयंती. या दिनाचे माहात्म्य या लेखातून जाणून घेऊया.

भावार्थ : ज्यामुळे आपल्या जीवनाचे पोषण सुरळीत चालू आहे, त्या धनाची या दिवशी पूजन करतात. येथे धन म्हणजे शुद्ध लक्ष्मी. श्रीसूक्तात वसू, जल, वायू, अग्नी आणि सूर्य यांना धनच म्हटले आहे. ज्या धनाला खरा अर्थ आहे, तीच खरी लक्ष्मी ! अन्यथा अलक्ष्मीमुळे अनर्थ घडतो.

वैशिष्ट्ये : हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो; कारण धनप्राप्तीसाठी श्री लक्ष्मीदेवीचे पूजन केले जाते. या दिवशी ब्रह्मांडात श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व प्रक्षेपित होत असते. त्यामुळे जिवाला श्री लक्ष्मीदेवी आणि नारायण यांची कृपा संपादन करता येते. ती कृपा जिवाच्या भावावर टिकून राहाते. आताच्या काळात साधकांना शक्तीची आवश्यकता आहे, तसेच व्यावहारिक सुखापेक्षा जगणे आणि आयुष्य टिकवणे महत्वाचे आहे. त्यामुळे साधना करणाऱ्या जिवासाठी हा दिवस महापर्वणी समजला जातो. साधनेसाठी अनुकूलता आणि ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठी या दिवशी धनलक्ष्मीची पूजा करतात. वर्षभर योग्य मार्गाने धन कमवून वार्षिक उत्पन्नाचा १/६ भाग धर्मकार्यासाठी अर्पण करावा.



महत्त्व : या दिवसाला बोलीभाषेत धनतेरस असे म्हटले जाते. या दिवशी व्यापारी तिजोरीचे पूजन करतात. व्यापारी वर्ष दिवाळी ते दिवाळी असे असते. नव्या वर्षाच्या हिशोबाच्या वह्या या दिवशीच आणून त्यांचे पूजन करून वापरात आणल्या जातात.

धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन सुवर्ण विकत घेण्याचा प्रघात आहे. त्यामुळे वर्षभर घरात धनलक्ष्मी वास करते. वास्तविक लक्ष्मीपूजनाच्या वेळी वर्षभराचा आयव्यय (जमाखर्च) द्यायचा असतो. त्या वेळी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेली संपत्ती प्रभुकार्यासाठी व्यय केल्यास सत्कार्यात धन व्यय झाल्यामुळे धनलक्ष्मी शेवटपर्यंत लक्ष्मीरूपाने रहाते. धन म्हणजे पैसा. हा पैसा घामाचा, कष्टाचा, धवलांकित असलेला आणि वर्षभरात पै-पै करून जमा केलेला असावा. या पैशाचा न्यूनतम १/६ भाग प्रभुकार्यासाठी व्यय करावा, असे शास्त्र सांगते. परात्पर गुरु पांडे महाराज

पूर्वी राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्री दान करून खाली करायचे. तेव्हा त्यांना धन्यता वाटायची. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा आहे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता देत असे. त्यामुळे साहजिकच परत खजिना भरत असे. सत्कार्यासाठी धनाचा विनियोग झाल्यामुळे आत्मबलही वाढत असे.

# लक्ष्मीपूजन करण्याची पद्धत आणि महत्त्व

आश्विन अमावास्येच्या, म्हणजेच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्व मंदिरांत, दुकानांत, तसेच घराघरांत श्री लक्ष्मीपूजन केले जाते. आश्विन अमावास्येचा हा दिवस दीपावलीचा एक महत्त्वपूर्ण दिवस मानला जातो. सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; परंतु दीपावलीतील ही अमावस्या शरद पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेप्रमाणेच कल्याणकारी आणि समृद्धिदर्शक आहे. या दिवशी श्री लक्ष्मीपूजनासोबत अलक्ष्मी नि:सारणही केले जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करावयाच्या कृतीमागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.




**१. इतिहास**

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे.

**२. सण साजरा करण्याची पद्धत**

प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन् ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी लतापल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे.

लक्ष्मीपूजन करतांना एका चौरंगावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. काही ठिकाणी कलशावर ताम्हण ठेवून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. लक्ष्मीजवळच कलशावर कुबेराची प्रतिमा ठेवतात. त्यानंतर लक्ष्मी आदी देवतांना लवंग, वेलची आणि साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. मग हातातील चुडीने पितृमार्गदर्शन करतात. ब्राह्मणांना आणि अन्य क्षुधापीडितांना भोजन घालतात. रात्री जागरण करतात.

लक्ष्मीपूजनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले नाही, तर जेवढे उपलब्ध आहे, त्या साहित्यात भावपूर्णरित्या पूजाविधी करावा. बत्तासे आदी साहित्य न मिळाल्यास, देवाला घरातील तूपसाखर, गूळसाखर किंवा एखादा गोड पदार्थ यांचा नेवैद्य दाखवावा.

**लक्ष्मी कुणाकडे वास करते ?**

आश्विन अमावास्येच्या रात्री जागरण करतात. पुराणांत असे सांगितले आहे की, आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जिथे स्वच्छता, शोभा आणि रसिकता आढळते, तिथे तर ती आकर्षित होतेच; शिवाय ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त, तसेच क्षमाशील पुरुष आणि गुणवती अन् पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते.

**३. लक्ष्मीपूजनाच्या दिवसाचे महत्त्व**

सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; पण त्याला अपवाद या अमावास्येचा आहे. हा दिवस शुभ मानला आहे; पण तो सर्व कामांना नाही; म्हणून या दिवसाला शुभ म्हणण्यापेक्षा आनंदी दिवस म्हणणे योग्य !

**४. श्री लक्ष्मीदेवीला करावयाची प्रार्थना**

जमा-खर्चाच्या हिशोबाची वही लक्ष्मीसमोर ठेवायची आणि प्रार्थना करायची, हे लक्ष्मी, तुझ्या आशीर्वादाने मिळालेल्या धनाचा उपयोग आम्ही सत्कार्यासाठी आणि ईश्वरी कार्य म्हणून केला आहे. त्याचा ताळमेळ करून तुझ्यासमोर ठेवला आहे. त्याला तुझी संमती असू दे. तुझ्यापासून मी काही लपवून ठेवू शकत नाही. जर मी तुझा विनियोग योग्य प्रकारे केला नाही, तर तू माझ्या जवळून निघून जाशील, याची मी सतत जाणीव ठेवतो. तेव्हा हे लक्ष्मीदेवी, माझ्या खर्चाला संमती देण्यासाठी भगवंताजवळ तू माझी शिफारस कर; कारण तुझ्या शिफारशीशिवाय तो त्याला मान्यता देणार नाही. पुढील वर्षीही आमचे कार्य सुरळीत पार पडू दे.

**५. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री केर का काढतात ?**

अलक्ष्मी नि:सारण

महत्त्व : गुण निर्माण केले तरी दोष नाहीसे झाले, तरच गुणांना महत्त्व येते. येथे लक्ष्मीप्राप्तीचा उपाय झाला, तसेच अलक्ष्मीचा नाशही झाला पाहिजे; म्हणून या दिवशी नवीन केरसुणी विकत घेतात. तिला लक्ष्मी म्हणतात.

कृती : मध्यरात्री नवीन केरसुणीने घरातील केर सुपात भरून तो बाहेर टाकावा, असे सांगितले आहे. याला अलक्ष्मी (कचरा, दारिद्र्य) नि:सारण म्हणतात. एरव्ही कधीही रात्री घर झाडणे वा केर टाकणे करायचे नसते. फक्त या रात्री ते करायचे असते. कचरा काढतांना सुपे आणि दिमडी वाजवूनही अलक्ष्मीला हाकलून लावतात.

**६. लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक का काढावे ?**

आश्विन अमावास्येच्या दिवशी केल्या जाणाऱ्या श्री लक्ष्मीपूजनाच्या वेळी अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यांवरच श्री लक्ष्मीची स्थापना केली जाते. सर्व देवतांची पूजा करतांना त्यांना अक्षतांचे आसन दिले जाते. अन्य देवतांच्या तुलनेत श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व अक्षतांमध्ये ५ टक्के जास्त प्रमाणात आकृष्ट होते; कारण अक्षतांत श्री लक्ष्मीच्या प्रत्यक्ष सगुण गुणात्मक, म्हणजेच संपन्नतेच्या लहरी आकृष्ट करण्याची क्षमता असते. अक्षतांमध्ये तारक आणि मारक लहरी ग्रहण करून त्यांचे संचारण करण्याची क्षमता असल्याने लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढावे. स्वस्तिकामध्ये निर्गुण तत्त्व जागृत करण्याची क्षमता असल्याने श्री लक्ष्मीच्या आसनाच्या स्वरूपात स्वस्तिक काढावे.

**७. लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणण्याचे कारण**

एखाद्या देवतेची उपासना केली की, त्या देवतेचे तत्त्व उपासकाकडे येते आणि त्यानुसार लक्षणे दिसतात, उदा.श्री लक्ष्मीची उपासना केली की, धनप्राप्ती होते. उपासना कमी झाली, अहं जागृत झाला की, देवतेचे तत्त्व उपासकाला सोडून जाते. अशाच कारणांमुळे श्री लक्ष्मी उपासकाला सोडून जाते. तेव्हा स्वतःची चूक मान्य न करता व्यक्ती म्हणते, लक्ष्मी चंचल आहे. येथे लक्षात घेण्यासारखे सूत्र हे की, लक्ष्मी चंचल असती, तर तिने श्रीविष्णूचे चरण केव्हाच सोडून दिले असते.

परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते

संकलन : **सौ. अंजली पाध्ये, नागपूर**
संपर्क : ९९७५५ ३६९०६

# जीवनांतील अमुल्य तत्वे...!

सुखी जीवनाची खरी गुरूकिल्ली म्हणजे आयुष्यात अमुल्य तत्वांचा अधिक वापर करणे होय. अतिषय महतवाचा घटक म्हणजे आपली स्वतःची वेळ होय. जीवनात वेळे अभावी सर्व अर्थहिन आहे. आपण स्वतः कोणत्याही तत्वाची कधीही टिंगल करू नये, हा स्वतःचा अनादर होईल. आपल्याला ध्यैयपुर्ण, समाधानी जीवन जगावयाचे असेल तर वेळेचा आदर करणे महत्वाचे आहे हिच जीवनाची सफलता आपल्याला टिकविणे गरजेचे आहे. आपण वेळेचे नियोजन व्यवस्थितरित्या केल्यास कधीही त्रास होणार नाही व कामे वेळेवर झाल्यास दुसरे कार्य होण्यास मार्ग सुकर होईल. हेच समाधानी व्यवस्थितकरण होय. वेळेवर कोणतेही कार्य केल्यास आपल्या स्वतःला वेगळेपण प्राप्त होते. आयुष्यात एकदा वेळ गेली की, कधीही परत येत नसते. अर्थातच जीवन जगतांनी माणसाला वेळेचे भान असणे महत्वाचे नाही काय?

वेळ : आपण कोणतेही कामे करीत असाल तर आपण स्वतः आठवडयातील, महिन्याची कामे कषी करावयाची हि आखणी महत्वाची आहे. या योजनाबध्द आखणीमुळे आपण स्वतः वेळेचा उपयोग केल्यास स्वतःची कामे त्रास न होता वेळेवर होतातच हे मात्र खरे! वेळेवर कामे केल्यास जीवनाला योग्य असा आकार, स्वतः चे व्यकितमत्वाचा विकास व्हायला सोयीस्तरपणे वाव मिळतो व आनंद निर्माण होतो हे मानवी जीवनाचे खरे गुपीत होय. खाया अर्थाने पाहू जाता क्षमता ही अफाट जरी असली तरीपण आपण वेळेवर कार्य केल्यास हि क्षमता अधिकच कार्यषील राहील व आपल्याला जीवनात वेगळेपण अनुभवयाला मिळेल. षिवाय, आपण स्वतःच आयुष्याचा मालक बनु शकतो हेच आयुष्याचे अमुल्य घटक आहे असे समजावे.


पैसा : जीवन जगतांना आपण स्वतः कमायीचे साधन पाहुन खर्च करणे महत्वाचे आहे. आपण आयुष्यात कुणाबरोबर स्पर्धा करता कामा नये, असे केल्यास स्वतःला पैसे पुरेनासे होऊन निराषा येत असते. आपण विद्यार्थी दक्षेत असतांना किंवा बाहेरगावी षिकत असतांना येणाया पैषाचे खर्च करण्याचे नियोजन केल्यास पैसा बरोबर पुरेल व परिवार सदस्यांना त्रास न होता षिक्षण पूणत्वाकडे जाण्यास मदत होईल व आनंद मिळेल. पैसा खर्च करतांना कोणत्या कामाला किती पैसे खर्च करावे किंवा कोणते कार्य अगोदर करावे, याचे नियोजन करणे महत्वाचे असते, तेव्हा आपल्या जीवनात यषस्वी होण्यास अधिक मदत होते. आपण नियोजन करतांना भविष्याची दूरदृष्टी ठेवुन योग्य आखणीबध्द पध्दतीने खर्चाचे नियोजन केल्यास आपल्याला स्वतःला पुरेनासे होईल व वेळेवर पैसा असल्यामुळे त्रास होणार नाही हे सामान्यातुन षिकण्यासारखे आहे. पैषाची नियोजनबध्द कामे केल्यास जीवनात अतिउत्तम, समाधान मिळाल्याषिवाय राहणार नाही या व्यतिरिक्त आनंदाची दारे आपल्या स्वतःसाठी नेहमी उघडीच राहील व त्यात समाधानाची ज्योत नेहमीच तेवत राहील. जीवनात स्वतः कष्ट करून कामे केल्यास पैसा आपल्याजवळ अखेरपर्यंत टिकुन राहील. अन्यथा वाम मार्गाने किंवा कुण्या व्यक्तिला त्रास देवुन मिळविलेला पैसा आपल्याजवळ टिकुन राहत नाही हे अनुभवाअंती सिध्द झालेले आहे हे मात्र खरे! पैषाचे नियोजन खाया अर्थाने सोयीस्तररित्या करणे अगत्याचे आहे.

संयम : जीवनात, आपल्या वाईट काळात आपली किंमत कमी करण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो, मात्र संयम राखला तर आपले अस्तित्व कोणीच संपवु, हिरावुन शकत नाही. त्यासाठी आपले संयमाला टिकविणे फार महत्वाचे आहे. कोणतीही गोष्ट करतांना थोडाफार संयम राखल्यास मनासारख्या गोष्टी होण्यास स्वतःलाच मदत होत असते व जीवनात आनंद निर्माण होईल संयम बाळगणे हा आपला मानवी जीवन जगण्याचा सर्वोत्तम भाग असला पाहीजे. जीवनात संयम हा गुण व योजनाबध्द सर्व कामाची आखणी केल्यास स्वतः ला समाधान मिळेल. आपण निरर्थक गोष्टींना फार महत्व न देता किंवा सोयीस्कररित्या तिलांजली दिल्यास व स्वतः नाराज न राहता संयम राखल्यास येणारे दिवस आनंदात राहील. स्वतः आपण कार्यक्षम राहा, काही कामात वेळा पाळणे गरजेचे, कोणतेही कार्य मन राहुन केल्यास यषासाठी संयम राखल्यास नवी उर्जा, नवी चेतना प्राप्त होऊन यष संपादन होईल! संयम हे आपल्या जीवनावर परिणाम साधणारी व आयुष्याला खाया अर्थाने आकार व उर्जा देणारी गोष्ट असुन त्याचा उपयोगाला प्राधान्य देणे आवष्यक आहे. हे तत्वज्ञान जीवन आनंदीत होण्याचे खरे मार्गदर्षक ठरू शकतात. चुक नसतांनाही केवळ वाद टाळावा म्हणुन घेतलेली माघार हे संयमाच फार मोठ प्रतिक आहे.

विश्वास : कौत्युक करणाऱ्या शेकडो व्यतिपेक्षा प्रोत्साहीत करणारी एक व्यक्ती सोबत असावी जी आयुष्यात सर्व नकारात्मकतेला पुरून उरेल पण यासाठी स्वतःवर विष्वास, दुसायावर विष्वास असणे महत्वाचे आहे. जीवनात काही गोष्टी संयम बाळगुन करावयाच्या असेल तर स्वतःवर कायम विष्वास ठेवणे फार गरजेचे आहे. आपल्या विचारामध्ये, स्वप्नामध्ये हरवुन गेलेल्या व्यक्तीच्या गर्दीत एकांकी वाटु नये यासाठी स्वतःवर, इतरावर, कुटुंबातील सदस्यावर व स्वतःच्या व्यक्तीवर विष्वास बाळगणे, ठेवणे आदराणे संयमाने वागणे हेच आनंदमय जीवनाचे खरे गणीत आहे. पण, विष्वास हा माणुसकीला धरून असावा त्यामुळे आयुष्यात गुंतागुंत होत नाही. स्वतःच्या मर्जीने केलेल्या कामावर कार्यावर थोडाफार विष्वास ठेवल्यास स्वतःलाच त्याची यष प्राप्ती झाल्याषिवाय राहणार नाही. आपल्याला वैभवाच्या षिखरावर जात असतांना आपल्या स्वतःच्या व्यक्तीवर खाया अर्थाने विष्वास हा ठेवावाच लागेल. भविष्यात संयम आणि विष्वास एकत्र नांदले तर स्वतःच्या व इतरांच्या आयुष्यात आनंदाची पर्वणी यायला वेळ लागणार नाही हे मात्र तेवढेच खरे! यासाठी आपण ईष्वराचे आभार मानायला हवे कि ज्यांनी हा देह पृथ्वीस्थलावर चांगले करण्यासाठी पाठविला? माणसाचे वागणे नितळ असलं की, त्याच प्रतिबिंब कुठेही आणि कितीही गर्दी असली तरी उठुनच दिसत. पण, यासाठी विष्वास या गोष्टीवर अपार श्रध्दा बाळगल्यास मन आनंदीत होते. अर्थातच, आनंदी राहण्यासाठी पैषाने कमविलेल्या वस्तुपेक्षा स्वभावाने कमावलेली माणसे जास्त सुख देतात हेच विष्वास ठेवल्याचे खरे यष आहे असे म्हणता येईल.

व्यतिमत्व : चांगले व्यतिमत्व, स्वभाव हा आनंदापेक्षाही मोठा असा आनंद आहे. तो त्यालाच मिळतो ..... ही जो स्वतःला विसरून इतरांना आनंदीत करतो हेच व्यतिमत्व विकासासाठी पायाभरणी करून मन यषाकडे नेऊन आनंदाचे दार नेहमी उघडत असतो. पण शरीर सुंदर असेल किंवा नसेल, मात्र शब्द आणि मन, स्वभाव व्यतिमत्व शुध्द असायला हवे. कारण, माणसाची सवय आहे की, तो चेहरा लवकर विसरतो पण शब्द आणि चांगले मन, व्यतिमत्व कधीच विसरत नाही. हाच चांगुलपणाचा मार्ग जिवनात मनाची बाळगल्यास यषाचे क्षेत्रफळाचा प्रवास करता येईल. व्यक्तिमत्वात नेहमी खरेपणा असणे आवष्यक आहे तोच ध्येयापर्यंत आपल्याला खाया अर्थाने पोहचु शकतो यासाठी व्यतिमत्वाचा विकास, सवय, चारित्र्य, सन्मान, हरवेपण, त्याग, संयम या विविधांगी गोष्टीचा संग्रह ठेवणे अत्यंत गरजेचा आहे तरच चांगला विकास साधुन आपण सर्व विकासाच्या दिषेने जाण्यास सक्षम असु. कारण माणुस कळायला माणुसकी लागते. चांगल जगायला सुंदर विचार लागतात. भरभरूण जगायला पैसा नाही, तर आयुष्य लागत हेच सुखी आणि व्यक्तीमत्व विकास आणि चांगल्या विचाराचे खाया अर्थाने एक प्रकारचे आयुष्याचे समीकरण आहे. पाठीवरचा ओझापेक्षा मनावरचं ओझ नेहमी जड असतं... ते हलकं करायचं म्हटलं की, झेलणारा देखील तितकाच आपलासा असावा लागतो.तरच आनंदी सुखी जीवनाचे चाके समांतररित्या पूढे-पूढे चालत राहणार हाच सुखी जीवनाचा प्रवास म्हणता येईल. जीवनांत सुख दुःखाच्या खडतर वाटेवरून जातांना माणसं मिळवायचे असतात, शत्रु वजा करायचे असतात, सुखानी गुणायचे असते दुःखानी भागायचे असते, त्यामधुन उरते, ती बाकी म्हणजे जीवनाचे, आयुष्याचे खरे समाधान हेच जीवन प्रवासाचे खरे सोबती असतात.

जाता जाता.... आपल्याला यषस्वी जीवनाची वाटचाल करतांना वेळ पैसा, संयम, विष्वास आणि व्यतिमत्व, स्वभाव इत्यादी विविधांगी अमुल्य घटकाकडे जातीने लक्ष देणे महत्वाचे आहे. तरच सुखी जीवनाचे स्वप्न साकार करता येईल. जीवन सुंदर आहे त्याची सुंदरता कायम ठेवण्यासाठी स्वतःचा स्वभावाने, व्यतिमत्वाने अधिक सुंदर करू शकतो यासाठी संयम हळवेपण त्याग, मानसिकता, आदर सन्मान, दुसायाच्या विचाराचे समर्थन, स्वतःच्या व्यतिसोबत चर्चा तसेच आचार विचाराचे मंथन या विविध गोष्टी स्वतः सोबत बाळगल्या की, जीवनातील यष आपलेच आहे, असे समजावे. परिस्थिती प्रमाणे बदलणारी माणसे सांभाळण्यापेक्षा, परिस्थिती बदलविणारी माणसे सांभाळा... आयुष्यात कधीही अपयष अनुभवायला मिळणार नाही तसेच जलद गतीने मिळणारे यष अहंकार निर्माण करतात तर उषिरा मिळणारे यष आपलं व्यतिमत्व तयार करतं. स्वतःसोबत जेव्हा दुसायाच्या मनाचा देखील जेथे विचार केला जातो, तिथेच माणुसकीचं सुंदर नात तयार होतं. हेच सुखी व समृध्द जीवनाचे कोड तसेच अमुल्य घटक आहे, असे म्हणणे रास्त ठरावे!



: शब्दांकन :
**विजय सीताराम सोनारघरे**
२४, उदयनगर, नागपूर
मो.नं. ९३२५७३३८३६

## महत्त्वाचे

### सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेमध्ये वाचन प्रेरणा दिन

**नाशिकरोड ।** येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतन मध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या



जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी प्रकल्प संचालक प्रा. प्रदीप देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, "वाचन ही ज्ञानप्राप्ती ची पहिली पायरी आहे. प्राचार्या डॉ. श्रद्धा देशपांडे यांनी "नियमित वाचनामुळे विचारसंपन्नता, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्व विकास साधता येतो." असे प्रतिपादन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना कलाम यांच्या 'ड्रीम बिग' या संदेशाचा आदर्श घेऊन सातत्याने प्रगतीपथावर राहण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात ग्रंथपाल प्रा. गौरी बोराडे यांनी वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य सांगताना भारताचे माजी राष्ट्रपती आणि महान वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याची आणि विचारांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी वाचन कट्टा अंतर्गत पुस्तक प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले. डॉ. अब्दुल कलामांचे अग्निपंख, स्वामी विवेकानंद, ग्रेट आयडॉल्स, टाटा, मन माई है विश्वास, नेता, श्री नर्मदा परिक्रमा, याचबरोबर डॉ. अरुण निगवेकर, सुविदत्र, कस्तुरी, गुरुवंदना, आनंदयात्री, गांधीजी एक व्यक्ती या विचार ही संस्थेची प्रकाशने प्रदर्शनात समाविष्ट करण्यात आली. विद्यार्थ्यांना सदर पुस्तकांचे वाचन केले.

### आदिवासी दिव्यांगांची जिल्हा रुग्णालयात तपासणी

**नाशिक ।** केंद्र सरकारच्या सुचनेनुसार देशातील सर्व दिव्यांगांना नवीन स्वावलंबन कार्ड संलग्न दिव्यांग प्रमाणपत्र देण्याच्या सुचना



सर्व राज्यांना देण्यात आलेल्या आहेत, बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारकांना आळा बसून मुळ दिव्यांगांना लाभ मिळावा हा या मागचा मुख्य उद्देश असल्याचे शासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे. आदिवासी बहुल पेठ तालुक्यातील अनेक दिव्यांग प्रमाणपत्रापासुन वंचित असल्याची बाब प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र टीळे यांच्या निदर्शनास ही बाब आल्याने त्यांनी पेठ तालुक्यातील दिव्यांगांपर्यंत माहिती पोहचवून एकूण ४५ दिव्यांगांची जिल्हा रुग्णालयात तपासणी करण्यात आली. लवकरच या दिव्यांगांना यु आय डी संलग्न केंद्रीय प्रणालीचे दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. या वेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विभाग प्रमुख डॉ. भुषण साळुंखे, डॉ. संजय कुटे जनसंपर्क अधिकारी हुकुमचंद अघोणे आदींनी सहकार्य केले.

### बत्तीस चारी अंगणवाडी केंद्रात पोषण महा कार्यक्रम अभियान

**नाशिक ।** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजना



प्रकल्प येवला दोनच्या वतीने तालुक्यातील धुळगाव बिटातील बत्तीस चारी अंगणगाव येथील अंगणवाडी केंद्रात पोषण महा कार्यक्रम अभियान प्रकल्प अधिकारी श्रीमती आरती गांगुर्डे मुख्यसेविका सरला ठोंबरे ,ब्राम्हकुमारीच्या नीता दिदी सरपंच भारती गाढे ग्रामविकास अधिकारी गुंजाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आले.प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रकल्प अधिकारी आरती गांगुर्डे यांनी पोषण महा अभियान हे कुपोषणाशी लढण्यासाठी सुरु केलेला एक महत्वाचा कार्यक्रम असून यात शून्य ते सहा वयोगटातील मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती महिला स्तनदा माता यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रत्येक अंगणवाडीत हा उपक्रम राबविला जात असल्याची माहिती देऊन सर्व अंगणवाडी सेविकांनी या हे अभियान यशस्वीपणे राबवावे असे आवाहन केले. तर मुख्यसेविका सरला ठोंबरे यांनी या कार्यक्रमामुळे अंगणवाडी केंद्राची पायाभूत सुविधा सुधारते आणि पूरक पोषण आहार आरोग्य शिक्षण, आरोग्य तपासणी या सारख्या सेवांची गुणवत्ता वाढण्यास मदत होत असल्याची माहिती देऊन सखोल मार्गदर्शन करून पोषण आहाराचे महत्व पटवून दिले. यावेळी धुळगाव बिटातील सर्व अंगणवाडी सेविकांनी विविध प्रकारचे पौष्टिक पदार्थ बनवून त्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या पौष्टिक पदार्थांबद्दल उपस्थितांना माहिती दिली. या कार्यक्रमात गरोदर मातेची ओटीभरण कार्यक्रम घेण्यात आला.

# महायुतीचा झेंडा फडकविण्यासाठी जोमाने कामाला लागा : पगार

**मालेगाव ।** आगामी जिल्हा परिषद, नगरपालिका व पंचायत समितींच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँगेस व महायुतीचा झेंडा फडकविण्यासाठी जोमाने कामाला लागा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. रविंद्रनाना पगार यांनी केले आहे.



येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीच्या वतीने एकत्रित लढविण्यात येणार आहे. परंतु काही कारणास्तव मैत्रीपुर्ण जागा लढाई झाल्यास येणाऱ्या निवडणुकीत प्रत्येक जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा सक्षम उमेदवार तयार ठेवावा लागेल अशा सुचना देखील त्यांनी केल्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकींच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने निवडणुकीची तयारी सुरु करण्यात आली आहे. या निवडणुकांच्या पुर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी प्रत्यक्ष तालुकावार जाऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यात येत आहे. या दौऱ्यांतर्गत मालेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली येथील शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात संपन्न झाली. या दौऱ्याच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकण्यात आले आहे. यावेळी व्यासपीठावर मालेगाव तालुकाध्यक्ष किशोर इंगळे, विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष सतिष पवार, मालेगाव पुर्व तालुकाध्यक्ष रतन हलवर, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल कदम, ग्रंथालय सेलचे जिल्हाध्यक्ष विजय पवार, ग्राहक संरक्षण सेलचे जिल्हाध्यक्ष यशवंत शिरसाट, जिल्हा सरचिटणीस विलास सानप आदी उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जास्तीत जास्त उमेदवार निवडून आले तरच पक्षाची ताकद वाढत असते. त्यामुळे संपूर्ण तयारी करून ताकदीनिशी या निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. इच्छुक उमेदवारांनी प्रत्येक घराघरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा व महायुतीची प्रचार आणि प्रसार करावा. उमेदवारांनी आपली ताकद आणि तयारी अतिशय प्रभावीपणे करावी आणि जास्तीत जास्त उमेदवार निवडून येण्यासाठी जोमाने कामाला लागावे करावे असे आवाहन देखील ॲड. पगार यांनी केले. यावेळी महिलाध्यक्षा प्रतिभा खैरनार, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष विशाल सोनवणे, तालुकाध्यक्ष अमोल निकम, जिल्हा पदाधिकारी प्रशांत महाजन, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे सुजय आहेर, सोशल मिडीया सेलचे रोहित बोरसे, विश्वास पवार, प्रदीप खैरणार, संदिप शेवाळे, रविंद्र पवार, सुभाष पाटील, सुरेश खैरणार, आदींनी चर्चेत सहभाग घेतला. प्रास्ताविक किशोर इंगळे यांनी तर आभार सतिष पवार यांनी मानले.

# रावळगाव साखर कारखान्याचा तिसरा बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळा संपन्न

**रावळगांव ।** येथे तिसरा बॉयलर अग्नी प्रदिपन सोहळा भाडणे गावचे सरपंच अजय सोनवणे व सिमरन सोनवणे यांच्या हस्ते बॉयलर पुजन व अग्नि प्रज्वलित करून करण्यात आला. यावेळी कारखान्याचे चेअरमन बबनराव गायकवाड, सचिव शिवाजी कामठे, संचालक कुदंनबापु चव्हाण, प्रशांत गरुड, माजी सरपंच भास्कर पवार, गोकुळ पवार, दिलीप जाधव, राजु पवार, नारायण पवार व कामगार उपस्थित होते. याप्रसंगी बबनराव गायकवाड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मला रावळगावची साथ असेल तर हा साखर कारखाना कधीही बंद पडू देणार नाही. प्रशांतदादा गरुड यांनी यावेळी सांगितले की, एकवेळ अशी होती की या कारखान्यात सोन्याचा धूर निघत होता. पण कालांतराने हे बंद झाले. गायकवाड यांच्या येण्याने पुन्हा एकदा येथे सोन्याचा धूर निघाल्या शिवाय राहणार नाही. येथील तरुण बेरोजगार झाले आहेत. आपण हा कारखाना चालवायला घेतला आणि



येथील तरुणांना रोजगार मिळाला. तसेच भाडणे गावचे सरपंच अजय सोनवणे यांना सुध्दा मी विनंती करतो की, आपण रावळगावसाठी ऊस उपलब्ध करुन द्यावा. कारण येथील कामगार व शेतकरी पुन्हा एकदा जोमाने कामाला लागला आहे. मी येथील शेतकऱ्यांना आवाहन करतो की, आपण ऊस लागवड करावी. बापूसाहेबांनी शासनस्तरावर पाण्याचा प्रश्न सोडवून जास्तीत जास्त ऊस लागवडीसाठी प्रयत्न करावेत. तसेच येथील कामगारांनी कारखाना चालण्यासाठी जास्तीतजास्त योगदान देऊन आजपासून जोमाने कामाला लागावे. याच बरोबर कारखान्यास मदत करण्यासाठी या पंचक्रोशीतील शेतकरी, कामगार व रावळगावातील नागरिक आपल्या पाठीशी उभे राहतील असे आश्वासन याप्रसंगी मी देतो. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुंदनबापू चव्हाण यांनी केले. याप्रसंगी कारखान्याचे व्यवस्थापन कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धेत अशोक पाटील प्रथम

**नाशिक ।** पळसे येथील ग्रामाभिमान मंचच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त सार्वजनिक वाचनालयात आयोजित जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धेत योगाचार्य अशोक पाटील यांच्या 'जर तुझा पदर झालो असतो' या कवितेला प्रथम पारितोषिक तालुका शेतकी संघाचे सभापती शरद गायखे यांच्याकडून रोख रु.२१०० आणि सन्मानचिन्ह देण्यात आले.



बालकवयित्री उन्नती नाकील यांना उत्कर्ष क्लासेसकडून रोख रु.१७०० आणि सन्मानचिन्ह असे द्वितीय पारितोषिक देण्यात आले. तर अक्षदा जगताप यांच्या कवितेला राहुल फडोळ यांच्याकडून रोख रु.११०० आणि सन्मानचिन्ह देण्यात आले. वैजयंती सिन्नरकर, विनोद बैरागी, नक्षत्रा भामरे, बाळासाहेब गिरी, लीलाताई गायधनी, पारस ठाकूर यांना महाराष्ट्र माझा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विकास (बंटी) भागवत, कामगारनेते प्रशांत कापसे, विचारक्रांती वाचनालयाचे अध्यक्ष सुहास खाडे, मंगला गायकर, भास्कर चौधरी, कवी रवींद्र मालुंजकर पुरस्कृत सहा उत्तेजनार्थ पारितोषिकेही देण्यात आली. चिमुरडी कवयित्री अनुष्का घोडेराव आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील ज्येष्ठ कवी निवृत्ती कानवडे यांच्या आशयसंपन्न कवितांना विशेष रोख पारितोषिकांसह सहभागी सर्व ४५ स्पर्धकांना सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ आगळे स्मरणार्थ सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. परीक्षण सुप्रसिद्ध कवी प्रा.राजेश्वर शेळके यांनी केले. सोहळ्यास शेतकी संघाचे सभापती शरद गायखे, महाराष्ट्र माझा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विकास भागवत, शिवाजी हांडोरे, मनोज ठाकरे, प्रा.हेमंत कांबळे, पळसे ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष विष्णुपंत गायखे, उपाध्यक्ष अशोकराव गायधनी, सेक्रेटरी राजाराम गायधनी, शिवाजी गायखे, यशवंतराव आगळे, कामगार नेते प्रशांत कापसे, नामदेव गायधनी, दत्तात्रय गायधनी, माजी सरपंच नवनाथ गायधनी, संत जनार्दन स्वामी पतसंस्थेच्या चेअरमन लीलाताई गायधनी, आर्किटेक्ट श्रीकांत गायधनी, सामाजिक कार्यकर्ते संतोष गायधनी, विद्या काकळीज, चंद्रकांत उगले, कैलास गायकर, मंगल गायकर, लक्ष्मण जाधव, नानासाहेब सरोदे, आर्यन गायधनी, पी.डी.विंचू आदि मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजन मंचचे उपाध्यक्ष समाधान गायधनी, कोषाध्यक्ष प्रवीण गायधनी, अक्षय शिंदे, राहुल फडोळ, प्रदीप गायधनी, भास्कर चौधरी, प्रदीप ढेरिंगे, मानसी गायधनी, सोहम गायधनी, ओमकार गायधनी, कृष्णा सहाणे, मयूर गायकर, भारत टिळे, सुनील आगळे, श्रीराम पगार, आर्यन गायधनी, आदी सदस्यांनी केले. कवी रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले. मंचाध्यक्ष प्रमोद गायधनी यांनी प्रास्ताविक तर सचिव सुनील आगळे यांनी आभार मानले.

# बीवायके कॉलेजमध्ये इनोव्हेशन ॲण्ड स्टार्ट-अप सेलचे उद्‌घाटन



**नाशिक ।** येथील बी.वाय. के. कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक येथे इनोव्हेशन अँड स्टार्ट-अप सेलचे भव्य उद्घाटन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन व नवकल्पनांची भावना जोपासण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सी.टी.बोरा कॉलेजचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी अधिष्ठाता डॉ. के. सी. मोहिते उपस्थित होते. ते महाराष्ट्रातील अविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धा तसेच राष्ट्रीय स्तरावरील अन्वेषण या उपक्रमांमध्ये मोलाची भूमिका बजावणारे ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ आणि इनोव्हेशनचे प्रणेते आहेत. व्याख्यानादरम्यान त्यांनी प्रेरणादायी नवोपक्रमांची उदाहरणे सुद्धा मांडली. 'डीआरडीओ'मध्ये कार्यरत शास्त्रज्ञ भाऊ भोंत्रे यांनी विकसित केलेले इलेक्ट्रॉनिक नोज उपकरण, दुग्ध व्यवसायासाठी तयार केलेली नवीन दूध काढण्याची यंत्रणा, तसेच हायब्रिड वाहन या कल्पना यांचा विशेष उल्लेख केला.

# नाशिक येथे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात



**नाशिक ।** भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर रोजी संपूर्ण राज्यभर "वाचन प्रेरणा दिन" उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने श्री साई सार्वजनिक वाचनालय, नाशिक येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि वाचन प्रेरणा शपथ घेऊन करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी "वाचनाचे महत्त्व", "ज्ञानाची शक्ती" आणि "डिजिटल युगातील वाचन संस्कृती" या विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने घेण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर गव्हाणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "वाचन ही केवळ सवय नसून, ती समाजाच्या बौद्धिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे. प्रत्येक तरुणाने आणि विद्यार्थ्याने दररोज काही वेळ पुस्तक वाचनासाठी देणे गरजेचे आहे. ज्ञानाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे, हेच आमचे ध्येय आहे." या कार्यक्रमात उत्तम वाचकांचा सत्कार करण्यात आला.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना मनपा शिक्षण विभागाकडून दिवाळी भेट

**नाशिक ।** 'जागतिक पांढरी काठी दिन' आणि 'वाचन प्रेरणा दिन' या दुहेरी औचित्याने मनपा शिक्षण विभागाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांना दिवाळी भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

बुधवारी (दि. १५) 'जागतिक पांढरी काठी दिन' तसेच भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' या दुहेरी औचित्याने नाशिक महानगरपालिका शिक्षण विभागात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मनपा आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रेरणेने समावेशित शिक्षण (Inclusive Education) उपक्रमांतर्गत दिवाळी सणाच्या



पार्श्वभूमीवर दिव्यांग विद्यार्थ्यांना भेटवस्तू आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मनपा अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपआयुक्त लक्ष्मीकांत साताळकर आणि प्रशासनाधिकारी डॉ. मिता चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात काही विद्यार्थ्यांना भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले व सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी सांगितले की, "मनपाच्या समाजकल्याण विभागातील ५% राखीव निधीतून शिक्षण केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक 'संसाधन कक्ष' निर्माण करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल व तातडीने कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्यांच्या शिक्षणासाठी लागणारी साधने व साहित्य उपलब्ध करून दिले जाईल." प्रशासनाधिकारी डॉ. मिता चौधरी यांनी पालक आणि शिक्षकांना उद्देशून म्हटले की, "दिव्यांग विद्यार्थी हे समाजाचा अविभाज्य घटक आहेत. त्यांच्यातील क्षमता ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि विशेष शिक्षकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. या प्रसंगी मनपा शाळा क्र. १ म्हसरूळ, शाळा क्र. ५७ मुक्तिधाम, शाळा क्र. ८७ पाथर्डी गाव, शाळा क्र. ४३ काठेगल्ली, सारडा कन्या विद्यालय, आदर्श माध्य सी.बी.एस. जनता विद्यालय सातपूर इत्यादी शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. शिक्षण विभागातील सर्व विशेष शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गड-किल्ले अभ्यासक कार्तिक सिंगचा रामशेजच्या पायथ्याशी सन्मान

**नाशिक ।** शिवकार्य गडकोट संस्थेवतीने दुर्गभक्त कार्तिक सिंग यांचा सन्मान करण्यात आला. भगवी शाल, संस्थेचे प्रमाणपत्र, श्रीफळ व पुस्तकं भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

रामशेजच्या पायथ्याशी असलेल्या दुर्ग संवाद कट्टा हा ठिकाणी हा कार्यक्रम झाला. यावेळी दुर्गसंवर्धन अभ्यासक राम खुर्दळ यांनी ही प्रस्तावनेत सांगताना रामशेजसाठो २५ वर्ष आम्ही शेकडो मोहिमा रामशेज वर केल्यात. अजूनही भरपूर कामं करायची आहे,. त्यासाठी रामशेज राज्य संरक्षित स्मारक व्हावं यासाठी दिंडोरी तहसीलदार, रामशेज तलाठी, ग्रामपंचायत कडे रामशेजचचे कागदपत्र नाशिकच्या राज्य पुरातत्व कडे द्यावी असे ही आवाहन यावेळी करण्यात आले, ग्रामपंचायत भेट घेऊन पत्र देण्यात आले. दरम्यान, "कार्तिक सिंग सारख्या युवकाने सायकलवर प्रवास केला, तो उतराचल राज्यात येऊन सह्याद्रीतील गडकिलल्यांची भेट घेत आहे. हे अतिशय प्रेरक आहे, स्वतःच्या सायकलवर प्रवास त्याने केला आहे,सायकलवर ५०० हुन अधिक मैल प्रवास त्याने केला आहे, आजच्या उत्सवात रमलेल्या पिढ्यानी त्याकडून धडा घेणं आवश्यक आहे,असे विचार राम खुर्दळ यांनी मांडले,

दरम्यान, शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेने २५ वर्षे राबून २१२ दुर्ग मोहिमा पूर्ण केल्यात. रामशेजवरील अखंडित अभ्यासपूर्ण दुर्गसंवर्धन कार्याची माहिती सांगितली, ते म्हणाले की दुर्गसंवर्धन क्षेत्रात "शिवकार्य गडकोटच्या दुर्ग संवर्धकांच्या मेहनतीने रामशेजवर येणारे अनेक पर्यटक, दुर्ग भटके, विविध संस्था या मेहनतीच कौतुक करतात,रामशेज वर अजून बरीच कामं, दुरुस्त्या करायचंय आहेंत, त्यासाठी रामशेज राज्य संरक्षित स्मारक व्हावे यासाठी नाशिकच्या पुरातत्व विभागाचे वनविभाग दिंडोरी,तहसीलदार,आशेवाडी चे तलाठी, ग्रामपंचायत यांच्या काडून नाशिक च्या पुरातत्व विभागाने पत्रातील माहिती पुन्हा पत्राने ग्रामपंचायत व तलाठी यांना पत्र दिले, रामशेजची शास्वत कामं व्हावी हा किल्ला राज्य संरक्षित स्मारक होनेकामी हे कागद द्यावे तलाठी यांना ही हे पत्र देण्यास सांगितले. रामशेजचा ऐतिहासिक ठेवा अधिक



भक्कम व्हावा पडझडं होतं असलेल्या बुरुजाची दुरुस्ती करणं अतिशय गरजेचं आहे. रामशेजच्या बदलासाठी आम्ही २५ वर्षे राबलो आहे. नाशिकच्या शिवकार्य गडकोट संस्थेच्या वतीने उत्तरांचल येथून आलेल्या दुर्गभक्त कार्तिक सिंग चा सन्मान रामशेजच्या पायथ्याशी (दि १५ ऑक्टोबर रोजी ) करण्यात आला, तत्पूर्वी रामशेज पायथ्याशी दुर्ग कट्टा याठिकाणी उत्तरांचल येथून आलेल्या शिवभक्त कार्तिक सिंग हा गेल्या महिन्यापासून नाशिकचे अनेक गडकिल्ले आपली सायकल घेऊन फिरत आहे, आज रामशेजला कार्तिक वाव त्याच्या सोबत दिंडोरी आय टीआयचे विद्यार्थी, मोठ्या संख्येने या मोहिमेत कार्तिक सोबत रामशेजच्या माथ्यावरील सर्वच ऐतिहासिक वास्तुची पाहणी केली.

दरम्यान, गडकिल्ल्याना भेटी देतांना साक्षात शिवरायांच्या पराक्रम व त्यागाचे स्मरण होते, कपाळाला गडाची माती लावल्यावर शरीरात नवे चैतन्य संचारते आणी देह ही पवित्र होतो म्हणून गड महाराजांच्या आयुष्यातील त्यांचे वीरा प्रमाणे होते,असे सत्काराला उत्तर देतांना कार्तिक सिंग ने सांगितले "तर विनोद नाठे यानेही आपले विचार मांडताना शिवरायांचे रयतेच राज्य हे मोठ्या त्याग बलिदानाने मिळाले,मराठ्यांच्या शौर्याची ही स्मारके आहेंत,त्यासाठी राम खुर्दळ व त्यांची शिवकार्य गडकोट संवर्धन संस्था दोन दशका पासून राबत आहे, त्यांच्या कामाला जोडून घ्या असे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी छत्रपतीं शिवराय व शंभूराजे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आशेवाडी चे सरपंच साहेबरावं माळेकर, उपसरपंच संदीप कापसे, दारणा सांगवीचे सरपंच भाऊसाहेब गोहाड,विनोद नाठे, शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेचे संस्थापक राम खुर्दळ,,संजय झारोळे, भुषण औटे, दत्ता कांबळे,सनी शेवाळे यासह दिंडोरी आयटीआय चे युवा विद्यार्थी उपस्थित होते,जगदीश जाधव यांनी सूत्रसंचालन व आभार संजय झारोळे यांनी केले.

## महत्त्वाचे

### वाचन प्रेरणा दिन वाजे विद्यालयात उत्साहात साजरा

**सिन्नर ।** लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना, दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. या प्रसंगी मुख्याध्यापक रामनाथ रायते



यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देत सांगितले की, "वाचन ही ज्ञानाची किल्ली आहे आणि वाचनाची सवय मनुष्याला विचारशील व आत्मविश्वासी बनवते." या निमित्ताने विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आवडत्या कथा, कविता, चरित्रे आणि प्रेरणादायी विचारांचे वाचन करून आपले अनुभव मांडले. मराठी विभागाच्या वतीने वाचन स्पर्धा, वाचक गौरव सोहळा आणि पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाच्या उपशिक्षिका भारती निखाडे यांनी "वाचन संस्कृतीचे संवर्धन" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### रुग्णवाहिका चालकाने दिला अश्लील प्रस्ताव; चालकावर गुन्हा दाखल

**नाशिक ।** जिल्हा शासकीय रुग्णालयातून परतत असलेल्या आशा वर्कर महिलेला रुग्णवाहिका चालकाने रुग्णवाहिका थांबवून अश्लील प्रस्ताव दिला. या प्रकरणी संबंधित आशा वर्करने निफाड पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला (वय ३५, रा. कानळद, ता. निफाड) या आशा वर्कर दि. १८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री सुमारे ९ वाजेच्या सुमारास १०२ रुग्णवाहिकेने नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयातून विंचुरकडे जात होत्या. शिवरे फाट्याच्या पुढे आल्यानंतर रुग्णवाहिका चालक भाऊसाहेब गुडघे (रा. निमगाव वाकडा, ता. निफाड) याने गाडी थांबवली. त्यानंतर त्याने फिर्यादीच्या गळ्यात हात घालत तिच्या छातीस हात लावून "माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेवशील का?" असा अश्लील प्रस्ताव मांडला. या प्रकारामुळे फिर्यादी महिलेला मानसिक धक्का बसल्याने तिने तत्काळ पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. निफाड पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा तपास पोलिस निरीक्षक गणेश गुरव व पोलीस उपनिरीक्षक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार ढिकले करत आहेत.

### चांदवड महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा

**नाशिक ।** चांदवड येथील आबड कला, लोढा वाणिज्य व जैन विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी



महाविद्यालयाचे उपप्रचार्य डॉ. मनोज पाटील प्रमुख म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात अब्दुल कलाम यांच्या जीवन परिचय करून दिला. तसेच ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक संतोष ठाकरे यांनी प्रास्ताविकात त्यांच्या कार्याबद्दल तसेच त्यांनी व त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. कलाम यांनी व त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. वाचन अभिरुची वाढविण्यासाठी ग्रंथालयामार्फत वर्षभर ग्रंथ प्रदर्शन भरविले जाते.

### होरायझन अकॅडमीत विद्यार्थ्यांची दयाळूपणाची दिवाळी

**सिन्नर ।** येथील होरायझन अकॅडमीतर्फे "गरजू मुलांसाठी देणगी अभियान- करुणेची आणि आनंदाची दिवाळी" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो व यात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद असतो.



विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या निमित्ताने गरजू मुलांसाठी कपडे, खेळणी, पुस्तके आणि मिठाईचे वाटप करून सणाचा आनंद वाटला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव जोपासत "वाटण्यातच खरा आनंद आहे" हा संदेश दिला. लहानग्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या छोट्या बचतीतून व वस्तू संकलित करून त्या गरजूंपर्यंत पोहोचवल्या. या भावपूर्ण उपक्रमामुळे परिसरात संवेदनशीलतेचा आणि मानवतेचा सुंदर संदेश पसरला. मुख्याध्यापक नितीश नायर यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांनी करुणा, सहानुभूती आणि समाजसेवेचा खरा अर्थ प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचारसरणी आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होते. या प्रसंगी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

# गुन्हेगारांची 'दिवाळी तुरुंगात'

**नाशिक ।** शहरात दहशत निर्माण करत गुन्हेगारी करणाऱ्यांसाठी शुक्रवारी 'ब्लॅक फ्रायडे' ठरला. न्यायालयाने लोंढे बापलेकांना न्यायालयीन कोठडी सुनावली. तर न्यायालयाने विसेमळा गोळीबार प्रकरणातील मामा राजवाडे व सागर बागूलचा जामीन फेटाळला. न्यायालयाने अजय बागूल व अजय बोरीसा यांना वाढीव कोठडी सुनावली.

**लोंढे बाप-लेकाला न्यायालयीन कोठडी**

सातपूर आयटीआय सिग्नल येथील औरा हॉटेलमधील गोळीबारप्रकरणी पोलिसांनी टोळीप्रमुख बॉश तथा प्रकाश लोंढे, दीपक लोंढे, संतोष पवार, अमोल पगारे यांना शुक्रवारी (दि.१७) जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. यापूर्वी तीनवेळा लोंढे यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. पोलिसांनी तपास केला असून संशयितांना पोलिस कोठडी देवू नये, असा युक्तिवाद लोंढे यांचे वकील अॅड.राहुल कासलीवाल यांनी केला.

**दीपक लोंढे, सुकदेव बागूलने मागितली ९० लाखांची खंडणी**

पबमध्ये गोळीबार केल्याप्रकरणी तुरुंगाची हवा खात असलेल्या दीपक लोंढेसह सुकदेव हरी बागूल या दोघांनी बेकायदेशीर पद्धतीने शेतजमिनीवर ताबा करून तब्बल ९० लाखांची खंडणी मागितल्याचे समोर आले आहे. दोघांनी पैसे न दिल्याने फिर्यादीस जिवे मारण्याची व खोटा अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार व अजिंक्य विश्वासराव पाटील (वय ४६, रा. आडगाव) यांच्या फिर्यादीनुसार, औरा पबमध्ये तरुणावर गोळीबार केल्याच्या कटात दीपक लोंढेसह त्याचे वडील प्रकाश लोंढे सध्या तुरुंगात असून, लोंढे यांच्यासंदर्भात तक्रारी असतील तर पुढे यावे, तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवण्याचे आश्वासन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी दिले होते. त्यानंतर अनेक तक्रारदार पुढे आले. ९० लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी अजिंक्य विश्वासराव पाटील यांनी फिर्याद दाखल केली. मयत हरी दशरथ बागूल (रा. मुरंबी, ता. इगतपुरी) यांच्याकडून दीपक लोंढेने गट क्रमांक ८८९ मधील ८९ गुंठे जमीन रजिस्टर साठेखत करारनामा व विशेष मुखत्यारपत्र करून घेतले होते. जमीन परत करण्यासाठी संशयित आरोपींनी पाटील यांच्याकडे ९० लाख रुपयांची खंडणी मागितली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

**मामा राजवाडे, सागर बागुलचा फेटाळला जामीन**

विसेमळा गोळीबारप्रकरणात तीन जण फरार आहेत. तसेच घटनेचा सखोल तपास होणे बाकी असल्याने पोलीस कोठडीची मागणी सरकार पक्षातर्फे शुक्रवारी (दि.१७) न्यायालयात करण्यात आली. त्यानुसार न्यायालयाने यातील दोघांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. तर मामा राजवाडे, सागर बागूल, पप्पू जाधव, सचिन कुमावत यांच्या जामीन अर्जावर देखील दुसऱ्या कोर्टात सुनावणी झाली. न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे या दोघांचा कोठडीतील मुक्काम वाढला आहे. या घटनेतील संशयित आरोपी तुकाराम चोथवे, बॉबी गोवर्धने, गोपाळ दायमा यांच्या मागावर पथके आहेत. हा गुन्हा संघटितपणे केल्याचे निष्पन्न झाले आहे. अजय बागूलच्या इशाऱ्यावर शहरातील गुन्हेगारी टोळ्या काम असल्याचे तपासातून समोर आले आहे.

**अजय बागूल, बोरीसा यांना वाढीव कोठडी**

विसेमळा गोळीबारप्रकरणात बागूल टोळीतील चौघांना शुक्रवारी (दि.१७) न्यायालयात हजर करण्यात आले. अजय बागूल, अजय बोरीसा यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. बागूल टोळीवर मकोका कारवाई केली जाणार असून, नाशिक शहर पोलिसांकडून जोरदार हालचाली सुरू आहेत.

## जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धेत अशोक पाटील प्रथम

**नाशिक ।** पळसे येथील ग्रामाभिमान मंचच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त सार्वजनिक वाचनालयात आयोजित जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धेत योगाचार्य अशोक पाटील यांच्या 'जर तुझा पदर झालो असतो' या कवितेला प्रथम पारितोषिक तालुका शेतकी संघाचे सभापती शरद गायखे यांच्याकडून रोख रु.२१०० आणि सन्मानचिन्ह देण्यात आले.

बालकवयित्री उन्नती नाकील यांना उत्कर्ष क्लासेसकडून रोख रु.१७०० आणि सन्मानचिन्ह असे द्वितीय पारितोषिक देण्यात आले. तर अक्षदा जगताप यांच्या कवितेला राहुल फडोळ यांच्याकडून रोख रु.११०० आणि सन्मानचिन्ह देण्यात आले. वैजयंती सिन्नरकर, विनोद बैरागी, नक्षत्रा भामरे, बाळासाहेब गिरी, लीलाताई गायधनी, पारस ठाकूर यांना महाराष्ट्र माझा परिवाराचे



संस्थापक अध्यक्ष विकास (बंटी) भागवत, कामगारनेते प्रशांत कापसे, विचारक्रांती वाचनालयाचे अध्यक्ष सुहास खाडे, मंगला गायकर, भास्कर चौधरी, कवी रवींद्र मालुंजकर पुरस्कृत सहा उत्तेजनार्थ पारितोषिकेही देण्यात आली. चिमुरडी कवयित्री अनुष्का घोडेराव आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील ज्येष्ठ कवी निवृत्ती कानवडे यांच्या आशयसंपन्न कवितांना विशेष रोख पारितोषिकांसह सहभागी सर्व ४५ स्पर्धकांना सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ आगळे स्मरणार्थ सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. परीक्षण सुप्रसिद्ध कवी प्रा.राजेश्वर शेळके यांनी केले.

सोहळ्यास शेतकी संघाचे सभापती शरद गायखे, महाराष्ट्र माझा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विकास भागवत, शिवाजी हांडोरे, मनोज ठाकरे, प्रा.हेमंत कांबळे, पळसे ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष विष्णुपंत गायखे, उपाध्यक्ष अशोकराव गायधनी, सेक्रेटरी राजाराम गायधनी, शिवाजी गायखे, यशवंतराव आगळे, कामगार नेते प्रशांत कापसे, नामदेव गायधनी, आर्यन गायधनी, आदी सदस्यांनी केले. कवी रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले. मंचाध्यक्ष प्रमोद गायधनी यांनी प्रास्ताविक तर सचिव सुनील आगळे यांनी आभार मानले.

## प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यांना राष्ट्रीय पातळीवरील डॉ. राराविकर पुरस्कार

**नाशिक ।** मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील डॉ. अरुणा राराविकर प्रथम क्रमांकाचा पुरस्कार बिटको महाविद्यालाचे प्रभारी प्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे यांना जाहीर झाल्याची माहिती अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाहक खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी दिली.



हा पुरस्कार अखिल भारतीय पातळीवर उत्कृष्ट आर्थिक लेखासाठी दिला जातो. डॉ. शहाणे यांनी लिहिलेल्या कांदा समस्येवरील "कांदा किमतीचे चक्रव्यूह भेदणार कसे" या आर्थिक लेखाला सदर पुरस्कार जाहीर झालेला आहे. ते बिटको महाविद्यालय नाशिक रोड येथे अर्थशास्त्र विभाग प्रमुख, प्रभारी प्राचार्य या पदावर कार्यरत असून आर्थिक घडामोडींचे जाणकार आहेत.

# एफडीए खाते अधिक गतिमान करण्याचा मानस : ना. झिरवाळ

## निमा सभागृहात कार्यशाळा : भेसळ ओळखण्याचे प्रात्यक्षिक

**सातपूर ।** राज्याचे अन्न व औषधे प्रशासन खाते (एफडीए) अधिक कार्यक्षम व गतिमान करण्याच्यादृष्टीने शासनातर्फे पावले उचलण्यात येत आहेत, असे प्रतिपादन अन्न व औषधे प्रशासन खात्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी काढले.




अन्न व औषधे प्रशासन तसेच नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) यांच्या संयुक्त विद्यमाने 'सण महाराष्ट्राचा संकल्प अन्न सुरक्षिततेचा' या विषयावर जनजागृती कार्यशाळा निमा हाऊस (सातपूर) येथे आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ना. झिरवाळ बोलत होते. व्यासपीठावर निमाचे अध्यक्ष आशिष नहार, आयमाचे अध्यक्ष ललित बूब, अन्न व औषधे खात्याचे सहाय्यक आयुक्त मनिष सानप, विनोद धवड, अपर्णा फरांदे, निमाचे उपाध्यक्ष मनिष रावल, सहसचिव किरण पाटील, निमाच्या अन्नसुरक्षा समितीचे चेअरमन वैभव नागशेठिया, को-चेअरमन भावेश भन्साळी आदी होते. ना. झिरवाळ पुढे म्हणाले की, याआधी एफडीएकडे येणाऱ्या नमुन्यांची तपासणी १४ महिन्यांपर्यंत रखडत होती. ती आता दोन ते चार महिन्यांवर आणण्यात यश आले आहे. ही तपासणी लवकर व्हावी यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. आपण काय सेवन करतो त्यावर आपल्या प्रकृतीचे रहस्य अवलंबून असते. जर्मनीतले लोक बाहेरून आणलेल्या सर्व वस्तू तपासून खातात. अन्न हे औषध म्हणून खा. तसे न केल्यास औषध हे अन्न म्हणून खावे लागेल असा गंभीर इशाराही त्यांनी दिला. प्रास्ताविक निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी केले. कार्यक्रमास चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, अखिल राठी, कैलास पाटील, हेमंत खोंड, नितीन आव्हाड, गोविंद बोरसे, महेंद्र छोरिया, संजय राठी, राजाराम सांगळे, नानासाहेब देवरे, भावेश माणेक, सोनल दगडे, सूदांशू पाटील तसेच एफडीएचे अधिकारी, उद्योजक व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिटको महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाचे बॅडमिंटन स्पर्धेत यश

**एकलहरे ।** गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी १९ वर्ष आतील गटामध्ये मीनाताई ठाकरे विभागीय स्टेडियम नाशिक येथे झालेल्या शालेय विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. उत्तुंग कामगिरी करत जळगाव, धुळे, नंदुरबार, मालेगाव, नाशिक पाच जिल्ह्यातील स्पर्धकांना नमवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

दि. ३ ते ५ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथे होणाऱ्या राज्यस्तर स्पर्धेसाठी नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. यात संतोषी खैरनार, साक्षी पगारे, यशस्वी बाहरी, विजया आहिरे, सांची बागुल



यांचा समावेश आहे. कष्ट, एकाग्रता व आत्म विश्वासामुळे ही यशाची पायरी त्यांना गाठता आली आहे. त्यांच्या या सुयशाबद्दल गोखले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे, सचिव डॉ. दिप्ती देशपांडे, चेअरमन डॉ. सुहासिनी संत, डॉ.राम कुलकर्णी, प्रा.पी. एम. देशपांडे, शैलेश गोसावी, अक्षय देशपांडे, डॉ.व्ही.एन.सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे, उपप्राचार्या प्रणाली पाथरे, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## सोयाबीन खरेदीसाठी बुधवारी राज्यात आंदोलन

### किसान सभेच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत निर्धार

**नाशिक ।** सोयाबीनला केंद्र सरकारने ५३२८ रुपये हमी भाव जाहीर केला. मात्र अद्याप एकही सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले नाही शेतकऱ्यांच्या या प्रश्नांवर तीव्र लढा संघटित करण्यासाठी किसान सभेच्या वतीने बलिप्रदेला राज्यभर आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

किसान सभेची नाशकात दोन दिवशीय कार्यशाळा घेण्यात आली. यात आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली. त्यात अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची पिके, गोठे, विहिरी, जमिनी नष्ट झाल्या आहेत. मात्र शेतकऱ्यांना पुरेशी मदत सरकारच्या वतीने झाली नाही असा आरोप करण्यात आला. सोयाबीन खरेदी केंद्र प्रत्येक बाजार समितीत सुरू करा, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा, अतिवृष्टी नुकसान भरपाई मदतीत भरीव वाढ करून किमान ५० हजार रुपये एकरी मदत द्या आदी दहा मागण्यांसाठी गावस्तरावर हे आंदोलन करण्यात येईल. बलिप्रतिपदेच्या दिनी गावाच्या चावडीवर सोयाबीन ओतून हे आंदोलन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेला अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष माजी आ. जे. पी. गावीत, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले, राज्य अध्यक्ष उमेश देशमुख, राज्य उपाध्यक्ष सुनील मालुसरे यांनी मार्गदर्शन केले. राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्तांना ३१,६०० कोटींचे पॅकेज जाहीर केल्याचे सांगितले जात असले तरी, प्रत्यक्षात जुन्याच अनेक योजनांची बेरीज करून सरकारने हा आकडा फुगविला आहे. प्रत्यक्षात केवळ ६,५०० कोटी इतकीच रक्कम सरकारने नव्याने दिलेली आहे. शेतकरी कर्जमुक्तीचे दिलेले आश्वासनही सरकारने पाळलेले नाही. शेतकऱ्यांचा या सर्वामुळे मोठा विश्वासघात झाला आहे. दीपावली नंतर या प्रश्नावर मोठे राज्यव्यापी आंदोलन उभे करण्याचा निर्णय किसानसभेने घेतला आहे.

## 'स्वर सावाना' सांस्कृतिक कार्यक्रमाचे पंधरावे पुष्प

**नाशिक ।** सार्वजनिक वाचनालय, नाशिक ही १८५ वर्षे परंपरा असलेली वाचन संस्कृती आणि सांस्कृतिक कार्य



करणारी अग्रगण्य संस्था आहे. नाशिकच्या सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम संस्थेच्यावतीने नेहमीच होत असतात. शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसार तसेच अभिजात संगीताची जपणूक, कलाकारांना व्यासपीठ आणि सुजाण संगीत प्रेमी रसिकांना आनंद देणे या हेतूने संस्थेच्यावतीने स्वर सावाना या सांस्कृतिक (सांगितिक) कार्यक्रमाचे पंधरावे पुष्प गुंफण्यात आले. पं. शंकरराव वैरागकर व त्यांचे शिष्य यांनी या मैफलीतुन शास्त्रीय/उपशास्त्रीय संगीत, बंदिशी, भक्तीगीते याचे सादरीकरण केळे. गायन साथ अर्थाव वैरागकर, संवादिनी आनंद अत्रे, तबला ओंकार वैरागकर, संगीत कुलकर्णी तसेच तानपुरा संगत धनश्री सीमंत व नेहा आहेर यांनी साथ दिली.

## पेठ तालुक्यात राजकीय गप्पांचा तडका

### चहाच्या हॉटेलांत उमेदवारांच्या चर्चांना ऊत!

**पेठ । प्रकाश पगारे यांजकडून ।** चहाचा कोरडा कप आणि राजकारणाची रंगतदार चर्चा हे पेठ तालुक्यातील सध्याचे समीकरण झाले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गटांच्या आरक्षण सोडतीनंतर तालुक्यातील राजकीय वातावरण अक्षरशः तापले आहे. कोहर व आंबे या नव्याने गठित गटांच्या आरक्षणात झालेल्या बदलानंतर अनेक इच्छुकांच्या राजकीय स्वप्नांना तडा गेला असून, काही जण नव्या समीकरणात स्वतःसाठी संधी शोधण्याच्या हालचालींना लागले आहेत.

कोहर गट महिला अनुसूचित जमातीसाठी राखीव झाला असून, नव्यानेच स्थापन झालेला धोंडमाळ गट बदलून 'आंबे गट' झाला आहे. हा गटही अनुसूचित जमातीसाठी राखीव ठरल्याने या दोन्ही ठिकाणी नवे चेहरे आणि नवे समीकरणे उभे राहणार हे निश्चित झाले आहे. महिला आरक्षण लागू झाल्याने गेली दोन-तीन वर्षे मतदारसंघात सक्रीय राहून कामे करणाऱ्या अनेक संभाव्य उमेदवारांच्या राजकीय गणितावर पाणी फिरले आहे. मात्र, त्यांच्याच घरातील महिलांना पुढे करण्याच्या हालचालींनी गुप्त मोहीम जोर पकडली आहे. दरम्यान, अनुसूचित जमातीसाठी राखीव झालेल्या आंबे गटात दावेदारीसाठी चढाओढ सुरू असून, काही जणांनी तर "गुडघ्याला बाशिंग बांधून" गण आणि गट दोन्हीकडे उमेदवारीचा दावा साधण्याची तयारी सुरू केली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात राजकीय फटाके आधीच वाजू लागले आहेत. काही इच्छुकांनी आपल्या "उमेदवारीच्या फुसक्या फटाक्यांचा" आवाज आधीच करून टाकला आहे, तर काहींनी आपली दिवाळी शांततेत साजरी करत "मुख्य फटाके" निवडणूक तारखा जाहीर झाल्यावरच फोडायचे ठरवले आहेत. काही गटात महिला आरक्षण आणि काही ठिकाणी अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू झाल्याने पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला आहे. त्यामुळे काहींनी आता पक्षबदलाच्या चर्चांना हवा दिली आहे. "कोण कुठल्या पक्षात दिसेल?" हा प्रश्नच आता चर्चेचा मुख्य विषय ठरला आहे. राष्ट्रीय काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे गट, शिवसेनेचे दोन्ही गट, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, भारतीय जनता पक्ष आणि स्वतंत्र उमेदवार- अशा सर्व पातळ्यांवर इच्छुकांची चहापान बैठकीतली हलचल सुरू आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याआधीच पेठ तालुक्यातील प्रत्येक चहाचे हॉटेल हे आता राजकीय रणांगण बनले असून, कोऱ्या चहासोबत कोऱ्याच चर्चांना उधाण आले आहे.

# प्रत्येक शहरात एक लाख युवकांना घडविणार : उद्योजक जाधव

**नाशिक ।** सध्याच्या परीस्थितीत देशात हिंदू-मुस्लिम आणि राज्यामध्ये जाती-पातींमध्ये भांडणे लावत सत्ता भोगण्याची पद्धती अवलंबली जाते आहे. परंतु शिक्षण, आरोग्य, रोजगार, पायाभूत सुविधा या गोष्टींवर नागरिकांनी सत्ताधार्यांना जाब विचारण्यासाठी रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. आगामी महानगरपालिका निवडणूकीतून आमचा पक्ष सत्तेत आला तर प्रत्येक शहरात एक लाख युवकांना उद्योजक घडविताना, त्यांना प्रशिक्षण व उद्योग उभारणीसाठी पाठबळ दिले जाईल, अशी घोषणा नामदेवराव जाधव यांनी केली.

सनय छत्रपती शासन पक्षाच्या वतीने पी अॅण्ड टी कॉलनीतील ब्राह्मण मध्यवर्ती संस्था सभागृह येथे आयोजित व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. 'युवकांना राजकारणात संधी' असा व्याख्यानाचा विषय होता. सनय छत्रपती शासन महाराष्ट्र आरोग्य आघाडी प्रमुख डॉ.आनंद पवार यांनी या व्याख्यानाचे आयोजन केले होते. पक्षाचे इतरही पदाधिकारी व नागरिक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. नामदेवराव जाधव म्हणाले, युवकांनी सजग होण्याची गरज आहे. जाती-धर्मावर तेढ निर्माण केला जात असेल तर भूमिका घ्यावी. धर्म ही खासगी गोष्ट आहे, जात हा कौटुंबीक विषय आहे. त्यामूळे यावर न बोलता रोजगार, शिक्षणावर बोलण्याचा आग्रह सत्ताधार्यांकडे धरावा. प्रत्येक युवकाला पोट आहे, त्यामूळे रोजगार द्या, अशी भूमिका घेतली पाहिजे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, खड्डेमुक्त रस्ते, धुळमुक्त रस्ते ही प्रत्येक नागरिकाची प्राथमिकता बनली पाहिजे. व या मुद्यांचा विचार उमेदवार निवडताना केला पाहिजे. युद्धापेक्षा जास्त लोक खड्यात पडून मरत असतील, तर खड्डे का बुजविले जात नाही.



खड्डे बुजविणे ही काही इतकी मोठी समस्या आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. निवडणूका येऊ घातल्या असून अमूल्य असा मतदानाचा हक्क बजावताना हजार, पाचशे रुपयांमध्ये भविष्य विकले जाऊ देऊ नका, असे आवाहन त्यांनी केले. पैसे वाटप करणारे उमेदवार पैसे आणतात कुठून, हा विचार मतदारांनी करावा, असे सांगताना मतांसाठी खाऊ-पिऊ घालणे आमच्या पक्षाच्या उमेदवारांना जमणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सभोवतालच्या देशांचे उदारण देताना ते म्हणाले श्रीलंकासारख्या देशांमध्येही जाती-धर्मात भांडणे लावली जात होती. परंतु या देशांची अर्थव्यवस्था कोलमडली तेव्हा सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र आले व हाताला काम व पोटाला भाकरीची मागणी केली. अनेक वर्ष आधी छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेला हित कशा प्रकारे जोपासले याचा आदर्श घेण्याची गरज आहे.

**निवडणुकीत पक्ष चांगली कामगिरी करेल**

निवडणुका येतील जातील, परंतु रोजगार, शिक्षण व आरोग्याचे काय असा प्रश्न नेहमीच उपस्थित होते. आम्ही सत्तेत आलो तर राज्यातील प्रत्येक महापालिका क्षेत्रातील एक लाख लोकांना उद्योजक घडविण्यासाठी जागा, प्रशिक्षण, लायसन्स देणार असल्याची ग्वाही दिली. या प्रत्येक उद्योजकामुळे किमान ४ ते १० लोकांना काम मिळेल. कायद्याचा जिल्हा, उद्योगाचा जिल्हा, रोजगाराचा जिल्हा अशी प्रत्येक जिल्ह्याची ओळख निर्माण करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. वाढत्या गुन्हेगारीवर त्यांनी घणाघात केला. परीस्थिती बिकट होण्याआधीच पोलिस कारवाई का करत नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. बेरोजगारांचे तांडे उभे असल्यामुळे, असे युवक गुन्हेगारीकडे वळत असल्याची टीका त्यांनी केली. सिंगापूर या देशाचे उदाहरण देताना लोकप्रतिनिधी कसे असावे, याचे सविस्तर विश्लेषण त्यांनी केले. सनय छत्रपती शासन महाराष्ट्र आरोग्य आघाडी प्रमुख डॉ.आनंद पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज व इतर थोर पुरुषांकडून प्रेरणा घेत पक्षाची स्थापना केली आहे. आगामी निवडणूकीत पक्ष चांगली कामगिरी करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# सलग चौथ्या दिवशी शेअर बाजारात तेजी

## निफ्टी १३३ तर सेन्सेक्स ४११ अंकांनी वाढले

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

सोमवारी शेअर मार्केटमध्ये तेजी कायम राहिली आणि कॉर्पोरेट अर्निंग सिझनमध्ये गुंतवणूकदारांचा उत्साह टिकून राहिला. सेंसेक्समध्ये ४११ अंकांची वाढ झाली आणि तो ८४३६३ या स्तरावर बंद झाला. निफ्टीमध्ये १३३ अंकांची तेजी झाली आणि तो २५८४३ या स्तरावर बंद झाला. दिवाळी आठवड्यात बाजार सलग चौथ्या दिवशी वाढत राहिला. फेस्टिव्ह सिझनमध्ये गुंतवणूकदारांचा उत्साह कायम राहिल्याने बाजारात सातत्याने तेजी दिसून आली. कॉर्पोरेट अर्निंग सिझनमध्ये कंपन्यांच्या कमाईने गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे.



रिलायन्स इंडस्ट्रीज, भारती एअरटेल, इन्फोसिस, एसबीआय आणि ॲक्सिस बँक यांसारख्या दिग्गज शेअर्सनी निफ्टी ५० मध्ये तेजीचे नेतृत्व केले. निफ्टी मिडकॅप १०० मध्ये ०.७५ टक्क्यांची वाढ झाली, तर निफ्टी स्मॉलकॅप १०० मध्ये ०.४६ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे शेअर्स ३.६० टक्क्यांच्या वाढीसह १,४६८ रुपयांच्या स्तरावर बंद झाले. निफ्टी पीएसयू बँक इंडेक्स २.८७ टक्क्यांच्या वाढीसह सर्वात पुढे राहिला. त्यानंतर निफ्टी ऑईल अँड गॅस आणि निफ्टी आयटी इंडेक्स अनुक्रमे १.४१ टक्के आणि १ टक्के वाढले. निफ्टी मीडीया आणि निफ्टी फार्मा इंडेक्सही ०.८७ टक्क्यांच्या वाढीसह पुढे सरकले.

**सेन्सेक्स 84,363**

**निफ्टी 25,843**

सेक्टोरियल इंडेक्समध्ये निफ्टी ऑटो इंडेक्स सर्वात कमजोर ठरला, जो ०.१६ टक्क्यांनी घसरला.

सप्टेंबर तिमाहीतील पहिल्या तिमाहीच्या उत्पन्नात सर्वच क्षेत्रांचे प्रदर्शन चांगले राहिले असून यावरून सूचित होते की उत्पन्न आता आपल्या नीचांकी स्तरावर पोहोचले आहे. बँकांनी एसेट क्वालिटी आणि मार्जिनमध्ये सुधारणा दाखवली आहे, तर ग्राहक वस्तू कंपन्यांनी आतापर्यंत मजबूत आकडे सादर केले आहेत.

निफ्टीमध्ये तेजीचा ट्रेंड कायम आहे. निफ्टीने सोमवारी २५९०० च्या स्तरापेक्षा वर जाऊन ट्रेड केले. येत्या ट्रेडिंग सत्रात निफ्टी २६००० च्या स्तराच्या आसपास पोहोचू शकतो. निफ्टीने सोमवारी २५९२६ चा दिवसातील उच्चांक गाठला. निफ्टी आता हळूहळू २६२७७ च्या ऑल टाइम हाय स्तराच्या जवळ पोहोचत आहे. निफ्टीसाठी आता २५७५० चा स्तर मजबूत सपोर्ट म्हणून काम करू शकतो. निफ्टीने आपला बेस शिफ्ट केला असून आता २५७००-२५८०० चा परिसर बायिंग झोन मानला जात आहे.

# ट्रम्प यांच्याविरोधातील 'नो किंग्ज' रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अमेरिकेत लक्षावधी नागरीक रस्त्यावर

वॉशिंग्टन, दि. २० वृत्तसंस्था

अमेरिकेमध्ये शनिवारी 'नो किंग्ज' रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अमेरिकेमध्ये अनेक छोटी-मोठी ५० शहरे आणि उपनगरांत २,७०० ठिकाणी या 'नो किंग्ज' आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे हुकूमशाहीसारखे वागणे आणि प्रशासनातील भ्रष्टाचार याचा आंदोलनात निषेध करण्यात आला. आंदोलनामध्ये सर्व वयोगटातील नागरिक सहभागी होते.

आंदोलनामध्ये ट्रम्प राबवत असलेल्या धोरणांना विरोध करण्यात आला. न्यूयॉर्कमधील 'टाइम्स स्क्वेअर' येथे गर्दीचा




उच्चांक होता. पाच ठिकाणी एक लाखाहून अधिक नागरिकांनी शांततापूर्ण मोर्चे काढले. पोलिसांनी या ठिकाणी कुणालाही अटक केली नाही. बोस्टन, फिलाडेल्फिया, अटलांटा, डेनवर, शिकागो, सिएटल येथेही हजारोंच्या संख्येने गर्दी झाली होती. लॉस एंजेलिससह इतर ठिकाणीही नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेतला होता. सॅन दिएगो येथेही २५ हजारांहून अधिक नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेतला होता.

### मी राजा नाही : ट्रम्प

'ते माझा राजा म्हणून उल्लेख करीत आहेत. मी राजा नाही. डेमोक्रॅटिक पक्षाने कायमस्वरुपी सत्तेबाहेर राहावे. त्यामुळे अध्यक्ष म्हणून डेमोक्रॅटिक पक्षाचे कल्याणकारी उपक्रम मला बाजूला ठेवता येतील, अशी प्रतिक्रिया अध्यक्ष ट्रम्प यांनी आंदोलनापूर्वी दिली होती.

अमेरिकेतील 'शटडाऊन'मुळे अनेक सरकारी उपक्रम आणि सेवा ठप्प पडल्या आहेत. या मुद्द्यावरून सध्या काँग्रेस आणि न्यायालयादरम्यान सुरू असलेला संघर्ष एकाधिकारशाहीकडे झुकणार आहे, असे आंदोलनाच्या आयोजकांचे म्हणणे आहे.

# गरीब कैद्यांबाबत मोठा निर्णय; सुप्रीम कोर्टाचा सरकारला आदेश

नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था

देशभरातील तुरूंगामध्ये असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कैद्यांना मोठा दिलासा देणारा आदेश सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला दिला आहे. अनेक कैद्यांना जामीन मंजूर होतो, पण त्यासाठी त्यांचे पैसे नसतात. त्यामुळे त्यांना तुरुंगातून बाहेर येणे शक्य नाही. अशा कैद्यांना संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून सरकारने मदत करावी, असा ऐतिहासिक आदेश सुप्रीम कोर्टाने दिला आहे.



सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती एम. एम. सुनीरेश आणि न्यायमूर्ती एस. सी. शर्मा यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला आहे. कोर्टाने स्वत:हून या मुद्द्यावर सुनावणी घेत केवळ पैसे नसल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला जेलमध्ये ठेवले जाऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. देशामध्ये हजारो अंडरट्रायल कैदी असे आहेत, ज्यांना जामीन मिळाला आहे, मात्र पैशांअभावी ते जामीनासाठी बॉन्ड भरू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना तुरुंगातच राहावे लागत असल्याचे समोर आले आहे.

खंडपीठाने नव्या म्हटले की, जर एखाद्या गरीब आरोपीला जामीन रक्कम भरणे शक्य होत नसेल तर जिल्हा विधी प्राधिकरणाकडून ती रक्कम भरता येईल. प्राधिकरणाकडून जास्तीत जास्त १ लाखपर्यंतची रक्कम भरू शकेल. एखाद्या प्रकरणात ट्रायल कोर्टाने अधिकची रक्कम निश्चित केली असेल तर प्राधिकरणाकडून ही रक्कम कमी करण्यासाठी कोर्टात अर्ज दाखल करेल, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

जामीन मिळूनही आरोपी सात दिवसांत जेलमधून बाहेर गेला नाही तर संबंधित तुरूंग प्रशासनाला प्राधिकरणाकडे त्याबाबत माहिती द्यावी लागेल. त्यानंतर प्राधिकरणातील अधिकारी आरोपीजवळ जेलमध्ये त्याच्या खात्यात काही पैसे आहेत किंवा नाही, हे तपासेल. आरोपीकडे पैसे नसतील तर जिल्हा स्तरावरील समिती पाच दिवसांत त्याबाबत निर्णय घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देईल, असेही कोर्टाने म्हटले आहे.

'सपोर्ट टून पुअर प्रिझनर्स स्कीम' या योजनेअंतर्गत एका प्रकरणात एका कैद्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाऊ सकते. ही रक्कम संबंधित कोर्टात फिक्स्ड डिपॉझिट म्हणून जमा करता येईल. ही संपूर्ण प्रक्रिया इंटर-ऑपरेबल क्रिमिनल जस्टिस सिस्टीमच्या एकीकृत प्लॅटफॉर्मशी जोडली जाईल. त्यामुळे पोलीस, कोर्ट, जेल प्रशासन आणि फॉरेन्सिक लॅब यांना ही माहिती सहज उपलब्ध होऊ शकते. एखाद्या प्रकरणातील आरोपीला शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्तता झाली तर जामीनासाठी देण्यात आलेली रक्कम सरकारजमा होईल, हे ट्रायल कोर्ट निश्चित करेल.

# मालक असावा तर असा! सलग तिसऱ्या वर्षी ५१ कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून दिल्या आलिशान कार

चंदीगड, दि. २० वृत्तसंस्था

चंदीगडमधील एम. के. भाटिया या उद्योजकाने दिवाळी भेट म्हणून त्यांच्या कर्मचाऱ्यांना ५१ नवीन आलिशान कार भेट दिल्या आहेत. पंचकुला येथील मिट्स हेल्थकेअरचे संस्थापक आणि सामाजिक कार्यकर्ते एम. के. भाटिया यांनी नुकतेच त्यांच्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारच्या चाव्या सुपूर्द केल्या.



सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त आलिशान कार भेट देण्याचे भाटिया यांचे हे तिसरे वर्ष आहे. लिंक्डइनवरील एका पोस्टमध्ये भाटिया यांनी लिहिले, "गेल्या दोन वर्षांपासून, आम्ही आमच्या सर्वोत्तम कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त कार भेट देऊन त्यांचा सन्मान करतो. या वर्षीही ही परंपरा कायम ठेवली आहे."

"मी त्यांना कधीही कर्मचारी म्हणून वागवले नाही. ते माझ्या जीवनातील रॉकस्टार सेलिब्रिटी आहेत. आमच्या प्रवासातील प्रत्येक क्षणाला ब्लॉकबस्टर बनवणारे तारे आहेत. काही कर्मचाऱ्यांना आधीच कारच्या चाव्या दिल्या आहेत. आणखी काही कार लवकरच येणार आहेत. ही दिवाळी खूप खास असणार आहे!", असे म्हणत भाटिया यांनी कर्मचाऱ्यांना कारच्या चाव्या देतानाचे फोटो शेअर केले आहेत.

भाटिया यांनी या आठवड्यात काही कर्मचाऱ्यांना या आलिशान कार सुपूर्द केल्या आहेत. त्यानंतर शोरूमपासून कंपनीच्या मिट्स हाऊस ऑफिसपर्यंत "कार गिफ्ट रॅली" काढण्यात आली होती.

दरवर्षी इतक्या महागड्या भेटवस्तू का देता, असे विचारले असता भाटिया म्हणाले, "माझे सहकारी माझ्या औषध कंपन्यांचा कणा आहेत. त्यांचे कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि समर्पण हे आमच्या यशाचा पाया आहे. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन देणे आणि एका वेगळ्या उंचीवर नेणे हे माझे एकमेव ध्येय आहे."

# रशिया-युक्रेन युद्ध थांबवायचे असेल तर डोनबास क्षेत्राची वाटणी करा - ट्रम्प

वॉशिंग्टन, दि. २० वृत्तसंस्था

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी रशिया-युक्रेन युद्धावर मोठे भाष्य केले आहे. ते म्हणाले, "युक्रेनच्या डोनबास प्रदेशाचं विभाजन करून त्याचा मोठा भाग रशियाच्या ताब्यात देणं आवश्यक आहे. तसे केल्यास चार वर्षांपासून चालू असलेलं युद्ध थांबवता येईल." अमेरिकन हवाई दलाच्या एअर फोर्स वन या विमानातून प्रवास करत असताना ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, डोनबास प्रदेश जसा आत्ता विभागलेला आहे तसाच राहू द्या. दोन्ही बाजूंनी लढाई थांबली पाहिजे. दोन्ही बाजूच्या लष्करांनी आता घरी परतले पाहिजे आणि लोकांचा जीव घेणे थांबवले पाहिजे."

रशिया व युक्रेनमध्ये चार वर्षांपासून युद्ध चालू आहे. रविवारी युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यांमुळे दक्षिण रशियाच्या ऑरेनबर्ग गॅस संयत्राला आग आगली. रशियन सरकारची



कंपनी गॅझप्रोमचा हा गॅस प्रकल्प असून जगातील सर्वात मोठ्या गॅस संशोधन केंद्रापैकी एक आहे. रशियन अधिकाऱ्यांनी याबाबत सांगितलं की ड्रोन हल्ल्यात संयंत्राच्या एका भागाचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे कझाकस्तानकडून येणाऱ्या गॅसवरील प्रोसेसिंग युनिटमध्ये अडथळा निर्माण झाला आहे. यावर ट्रम्प यांनी भाष्य केलं आहे. ते म्हणाले, "युक्रेनला शांततेसाठी काही जमीन सोडावी लागेल."

याआधी देखील ट्रम्प यांनी या विषयावर भाष्य केले होते. गुरुवारी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीवेळी ट्रम्प यांना प्रश्न विचारण्यात आला होता की रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन युक्रेनचा भूभाग न घेता युद्ध समाप्त करण्यासाठी तयार होतील का? यावर ट्रम्प म्हणाले होते की "नाही, कारण ते काही भाग नक्कीच घेतील. आम्ही (अमेरिका) त्याबाबतीत उदार आहोत. अमेरिका एकटाच असा देश आहे जो युद्ध जिंकूनही भूभाग वगैरे न घेता मागे हटतो."

विशेष म्हणजे या मुलाखतीच्या काही वेळ आधी ट्रम्प यांची रशियाचे अध्यक्ष पुतिन व युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी चर्चा झाली होती. त्यामुळे ट्रम्प यांच्या या वक्तव्याला खूप महत्त्व प्राप्त झालं आहे. तसेच ट्रम्प यांनी मुलाखतीवेळी सांगितलं की "या आठवड्यात माझी आणि पुतिन यांची बुडापेस्टमध्ये भेट होऊ शकते." दरम्यान, यूक्रेनने रशियाच्या अनेक ऊर्जा संयंत्रांवर ड्रोन हल्ले वाढवले आहेत. त्यामुळे रशियाकडून यावर काय प्रतिक्रिया येते याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे.

# संघावर टीका करणे काँग्रेसची सवय - इंद्रेश कुमार

नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य इंद्रेश कुमार यांनी कर्नाटकचे मंत्री आणि काँग्रेस नेते प्रियांक खरगे यांच्या संघविरोधी वक्तव्यांना प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी म्हटले की, आरएसएसवर टीका करणे ही काँग्रेस पक्षाची सवय बनली आहे.

इंद्रेश कुमार म्हणाले, "हे देशाचे कायमचे दुर्भाग्य आहे की स्वातंत्र्याला प्रोत्साहन देण्याऐवजी काँग्रेसने देशाचे विभाजन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका करणे ही त्या पक्षाची जुनी सवय आहे. आता आरएसएसबद्दल विष उगाळणे ही काँग्रेस पक्षाची सवय झाली आहे. त्यांनी आरएसएसला नीट समजून घ्यावे आणि त्याबद्दल बोलणे थांबवावे."

प्रियांक खरगे यांनी अलीकडेच कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना पत्र लिहून शासकीय शाळा आणि महाविद्यालयांमध्ये आरएसएसच्या उपक्रमांना परवानगी देऊ नये, अशी विनंती केली होती. या वक्तव्यानंतर राजकीय वाद निर्माण झाला आहे.

खरगे म्हणाले होते, "आरएसएसच्या क्रियाकलापांमुळे तरुणांच्या मनाचे ब्रेनवॉशिंग होते, ज्यामुळे देश किंवा समाजाला काहीही फायदा होत नाही. मी मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे की, आरएसएसच्या सभा किंवा उपक्रमांना पुरातत्व मंदिरांमध्ये किंवा शासकीय मंदिरांमध्ये परवानगी देऊ नये. त्यांनी हे त्यांच्या खाजगी घरांमध्ये करावे, त्याबाबत आम्हाला काही हरकत नाही; परंतु शासकीय जागेचा वापर मोठ्या प्रमाणावर ब्रेनवॉशिंगसाठी केला जाऊ नये."

# मुलांमधील पोटाचा फ्लू आजार आणि उपचार

**बदलत्या ऋतूनुसार वातावरणात आणि हवामानात बदल होतोच. अर्थातच या बदलत्या वातावरणामुळे अनेक प्रकारच्या विषाणूजन्य,जिवाणूजन्य आणि बुरशीजन्य आजाराची लागण होते आणि हा आजार जर संसर्गजन्य असेल तर तो झपाट्याने पसरतो. सध्या हिवाळा सुरु आहे आणि तापमानात प्रचंड घट झालेली असल्यामुळेच अनेक प्रकारचे विषाणूजन्य आणि बुरशीजन्य आजार हे हवेच्या आणि पाण्याच्या मध्यमातून पसरण्याची भीती असते. थंडीच्या वातावरणात विशेषत: लहान बालकांना अशा आजारांची लागण लगेच होण्याची भीती असते. सध्या बालकांमध्ये पोटातील फ्लूचा आजार आणि त्याअनुषंगाने श्वसनाचे आजार लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. या फ्लू ची लक्षण नेमकी काय असतात?फ्लू होऊ नये म्हणून काळजी काय घ्यावी?आणि या आजारावर उपचार काय करायचे?या संधर्भात श्वसनविकारतज्ञ डॉ .छाया वजा यांच्याशी साधलेला संवाद.**

१]हिवाळ्यात वातावरणात बदल होतो सध्या तापमान प्रचंड कमी आहे या वातावरणात विशेषत: बालकांना कोणते आजार होतात?

प्रौढा प्रमाणेच हिवाळ्याचा लहान बालकांवर खूप परिणाम होतो. लहान मुलांमध्ये हिवाळ्यात पोटाचा फ्लू हा आजार बळावताना दिसतोय. त्याच वेळी सर्दी,खोकला आणि श्वसनविकार देखील वाढतात. कमी तापमानामुळे तीव्र स्वरूपाचा ब्रॉंक्रायटयसिस आणि न्यूमोनिया देखील काही मुलांमध्ये दिसतो. हवामानातील बदलामुळे ज्या मुलांची प्रतिकारशक्ती कमी असते अशा मुलांना दमा,ब्रॉंक्रायटसीस सारखे दीर्घकालीन आजार देखील होतात. थंड वातावरणामुळे बालक विषाणूंच्या संपर्कात आल्याने गॅस्ट्रो इंटेरी संधर्भात आजाराची लागण बालकांना लगेच होते.

२] बालकांमध्ये पोटाचा फ्लू हा



लोकारोग्य

आजार दिसतो त्याची लक्षण काय असतात?

लहान मुलांमध्ये प्रचंड प्रमाणात डोकेदुखी, अंगदुखी, ॲसिडिटी यासारख्या लक्षणासह तीव्र स्वरूपाचा ताप असेल तर हा ताप अजिबात अंगावर काढू नये. मुलांना तीन दिवसापेक्षा अधिक काळ जर ताप असेल तर ताबडतोप कोरोना चाचणी करून घेणे गरजेचे आहे. मुलांच्या शरीरात पाणायचे प्रमाण

हॅलो डॉक्टर

कमी झाल्याने त्यांना उलट्या आणि जुलाब होतात आणि प्रतिकार शक्ती देखील कमी होते. मुलांना पोटात दुखणे, भूक न लागणे अशी लक्षण देखील दिसतात.

३]अशा प्रकारच्या विषाणूजन्य आजारापासून मुलांना दूर ठेवण्यासाठी काय काळजी घ्यावी?

मुलांना संसर्गापासून वाचविण्यासाठी पालकांनी त्यांना गर्दीच्या ठिकाणी किंवा मोकळ्या ठिकाणी नेऊ नये .अस्वच्छ अन्न,शिळे अन्न आणि पाणी मुलांना देऊ नये. आजारी मुलांना शाळेत पाठवू नये. जेवणापूर्वी मुलांना हात साबणाने स्वच्छ धुवायला सांगावेत. मुलांच्या आहारात खिचडी,पालेभाजा आणि ताजा फळांचा समावेश करावा आणि साधा ताप किंवा खोकला असेल तर ताबडतोप वैद्यकीय सल्ला घ्यावा.

४]पोटाचा फ्लू या आजारावर वैद्यकीय उपचार कोणते आहेत?

जर मुलाला ताप असेल तर सुरवातीला तापावर प्रतिबंधात्मक उपचार म्हणून क्रोसीन गोळी दिली जाते. मात्र, हा ताप तीन दिवसापेक्षा जास्त काळ असेल आणि मुलाला डोकेदुखी, अंगदुखी, उलट्या, जुलाब अशी लक्षण दिसत असतील तर ताबडतोप वैद्यकीय उपचार सुरु करावेत. मुलाच्या शरीरातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी त्याला व्हायटल झेड पावडर पाण्यातून दर तासाने द्यावी. शिवाय मुलाला बाहेरचे काहीही खायला देऊ नये.मुलाला ताजा आणि सकस आहार द्यावा आणि जर परिस्थिती गंभीर असेल तर मुलाला ताबडतोप इस्पितळात दाखल करून पुढील उपचार सुरू करावेत.

## केअर हॉस्पिटल्सचे टेक महिंद्रासोबत भागीदारीत २४x७ पेशंट कॉल सेंटर सुरू

भारतातील आघाडीच्या आरोग्य सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या केअर हॉस्पिटल्सने जागतिक तंत्रज्ञान सेवा कंपनी टेक महिंद्रासोबत भागीदारीत



विकसित केलेल्या त्यांच्या नवीन अत्याधुनिक २४x७ बहुभाषिक कॉल सेंटरच्या लाँचची घोषणा केली. रुग्णांची उपलब्धता सुधारण्यासाठी, सेवा मानके मजबूत करण्यासाठी आणि व्यापक, किफायतशीर आणि सुलभ दर्जेदार आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या केअरच्या मुख्य नीतिमत्तेला पाठिंबा देण्यासाठी ही सुविधा डिझाइन केली गेली आहे.या लाँच कार्यक्रमाला केअर हॉस्पिटल्सचे वरिष्ठ नेतृत्व उपस्थित होते, मान्यवरांमध्ये श्री. शलभ डांग, मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी; श्री. विनोद रमण, गट मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, आयटी (क्यूसीआयएल); श्री. विजय सेठी, मुख्य आदरातिथ्य आणि रुग्ण अनुभव अधिकारी; श्री. राजीव चौरे, उपाध्यक्ष गुणवत्ता आणि मान्यता; नामपल्ली येथील एचसीओओ श्री. शशिकांत आम्सरे, स्ट्रॅटेजी अँड न्यू इनिशिएटिव्हज प्रमुख श्री. नवीन नारायणन आणि कॉल सेंटर ऑपरेशन्स प्रमुख सुश्री सिमरन कौर सेठी. टेक महिंद्राचे प्रतिनिधित्व करताना श्री. संजय घुरा, उपाध्यक्ष ऑपरेशन्स; श्री. कृष्णन कविक्कल, सहयोगी उपाध्यक्ष ऑपरेशन्स; श्री.

जनआरोग्य

कार्तिक, प्रादेशिक प्रकल्प प्रमुख; आणि व्यवसाय विकास आणि संक्रमण संघांचे सदस्य उपस्थित होते.

टेक महिंद्राशी भागीदारी केल्याने प्रगत ग्राहक संबंध व्यवस्थापन प्रणाली, अखंड रिअल-टाइम अपॉइंटमेंट वेळापत्रक आणि प्रशिक्षित कॉल सेंटर व्यावसायिक येतील. या संयोजनामुळे सर्व केअर रुग्णालयांमध्ये जलद प्रतिसाद वेळ, रुग्णांच्या विनंत्यांची कार्यक्षम हाताळणी आणि सातत्यपूर्ण, रुग्ण-प्रथम अनुभव मिळण्याची अपेक्षा आहे.

## गुणकारी जर्दाळू

जर्दाळू, त्यांची मखमली त्वचा आणि गोड, किंचित तिखट चव असलेले, हे केवळ एक स्वादिष्ट फळ नाही तर ते पोषक तत्वांचे पॉवरहाऊस देखील आहे. जर्दाळूमध्ये कॅलरीज कमी असतात परंतु फायबर, जीवनसत्त्वे आणि

आरोग्यम् धन संपदा

खनिजे जास्त असतात. त्यामध्ये विविध प्रकारचे अँटिऑक्सिडंट असतात आणि ते व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि लोहाचे उत्कृष्ट स्रोत आहेत. वाळलेल्या जर्दाळू हे ताज्या जर्दाळूंचे एक केंद्रित स्वरूप आहे आणि त्यामध्ये काही पोषक घटक जास्त प्रमाणात असतात. कोरडे केल्याने व्हिटॅमिन सीचे प्रमाण कमी होते, ते खनिजे आणि फायबरचे प्रमाण वाढवू शकते. तथापि, काही व्यावसायिकरित्या उपलब्ध असलेल्या वाळलेल्या जर्दाळूंमध्ये जोडलेल्या साखरेकडे लक्ष देणे देखील महत्त्वाचे आहे, ज्यामुळे त्यांचे आरोग्य फायदे कमी होऊ शकतात.जर्दाळू विविध प्रकारचे आरोग्य फायदे देतात जे तुमचे एकंदर कल्याण वाढवू शकतात. जर्दाळूमध्ये व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते, जे चांगली दृष्टी राखण्यासाठी आवश्यक असते. बीटा-कॅरोटीन हे एक अँटिऑक्सिडेंट आहे जे डोळ्यांना मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करण्यास मदत करते आणि वयोमानाशी संबंधित मॅक्युलर डिजनरेशनचा धोका कमी करू शकते, जे वृद्ध प्रौढांमध्ये अंधत्वाचे प्रमुख कारण आहे.जर्दाळूच्या बियापासून काढलेले जर्दाळू तेल बहुतेक वेळा त्याच्या हायड्रेटिंग गुणधर्मांसाठी स्किनकेअर उत्पादनांमध्ये वापरले जाते. व्हिटॅमिन ई आणि के समृद्ध, जर्दाळू कर्नल तेल त्वचेचे पोषण आणि मॉइश्चरायझेशन करण्यास मदत करते, निरोगी चमक वाढवते. याव्यतिरिक्त, जर्दाळूमध्ये आढळणारे अँटिऑक्सिडंट्स त्वचेला पर्यावरणाच्या हानीपासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात. जर्दाळूमधील आहारातील फायबर पचनास मदत करते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# कर्नाटकमध्ये 'जातीय जनगणना'ची मुदत वाढवली

बंगळुरू, दि. २० वृत्तसंस्था

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी सांगितले की सरकारने सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षण म्हणजेच 'जातीय जनगणना'ची मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. उर्वरित सर्वेक्षण काळात शिक्षकांचा वापर जनगणनेच्या कामासाठी केला जाणार नाही.

हे सर्वेक्षण कर्नाटक राज्य मागासवर्ग आयोगाद्वारे करण्यात येत आहे. हे सर्वेक्षण २२ सप्टेंबरला सुरू झाले होते आणि मूळतः ७ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होणार होते. मात्र, राज्य सरकारने नंतर सर्वेक्षणाची मुदत १८ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आणि शिक्षकांच्या मदतीने सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी शासकीय व अनुदानित शाळांच्या दसऱ्याच्या सुट्ट्याही १८ ऑक्टोबरपर्यंत वाढवल्या.

मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी वरिष्ठ मंत्री आणि अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सर्वेक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या बैठकीला कर्नाटक राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष मधुसूदन आर. नाईकही उपस्थित होते.

शिवकुमार म्हणाले, "राज्यातील इतर सर्व भागांमध्ये बेंगळुरू दक्षिण, बीदर आणि धारवाड वगळता सर्वेक्षणाचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे आणि ते व्यवस्थित पार पडले आहे. बेंगळुरू शहरात सध्या ६७ टक्के कव्हरेज झाले असून २० टक्के लोकांनी माहिती दिलेली नाही. त्यामुळे आम्ही सर्वेक्षणाची मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे. आता पुढे आम्ही जनगणनेच्या कामासाठी शिक्षकांचा वापर करणार नाही."

ते पुढे म्हणाले, "जनगणनेच्या कामासाठी २०, २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी दीपावलीची सुट्टी असेल. सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी इतर सरकारी कर्मचाऱ्यांचा वापर केला जाईल. ऑनलाइन सर्वेक्षणाचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल, ज्याचा वापर कोणीही करू शकतो. सर्वेक्षण ३१ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहील."




महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002. **Group Editor-in-Chief and Director - Shrikrishna Tansukhdas Chandak**, Group Editor - **Sandeep Ramrao Kale,** Managing Editor - **Pankaj Shrikrishna Chandak**, **Resident Editor- Jayant Mahajan.** **PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **समूह मुख्य संपादक व संचालक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३), समूह संपादक - संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक - पंकज श्रीकृष्ण चांडक निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**